नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ३६ * अंक ३५५ * * खामगांव (बुलडाणा) * शुक्रवार, दिनांक २० जून २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कोरोनामुळे यावर्षी देशात ११६ मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :**
देशात कोरोनाव्हायरसच्या सक्रिय रुग्णांची संख्या ५९७६ वर आली आहे. गेल्या २४ तासांत ५०७ रुग्ण बरे झाले आहेत. त्याच वेळी, ४० नवीन रुग्णांची नोंद झाली आहे.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून नवीन प्रकारामुळे ११६ मृत्यू झाले आहेत. दिल्लीत २ आणि केरळमध्ये १ मृत्यू झाला आहे. केरळमध्ये सर्वाधिक १३०९ सक्रिय रुग्ण आहेत. केरळमध्ये सर्वाधिक ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. गुजरातमध्ये १०४६ आणि पश्चिम बंगालमध्ये ७४७ रुग्ण आढळले आहेत. नवीन प्रकार देशातील ३२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरला आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## वनविद्यावाचस्पती गेले दिगंतरा

वनाच्या मनात ज्यांचे स्थान होते, त्या मारुती चित्तमपल्ली यांची जीवनयात्रा संपली. शिक्षण घेतल्यानंतर आयुष्यभर ज्यांनी वन आणि पर्यावरण यांची अत्यंत तळमळीने शुश्रुषा केली, सेवा केली. ते वनविद्या वाचस्पती मारुती चितमपल्ली यांनी काल इच्छामरण पत्करले. या वनवाचस्पतीचे मृत्यूपूर्वीचे शेवटचे शब्द कोणते असावेत, 'माझ्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या आहेत, आता मला जाण्याची परवानगी द्या'. त्यांचे सख्खे पुतणे श्रीनिवास चितमपल्ली यांना हे शब्द आघातासारखे वाटले. मारुती चितमपल्ली यांचे संपूर्ण जीवन जवळजवळ विदर्भातच गेले. सरकारी नोकरीच्या निमित्ताने ते विदर्भात आले आणि विदर्भाच्या वनांचे दत्तक पुत्र झाले. येथील जंगलांशी त्यांनी घट्ट नाते जुळवलेले होते. त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी आणि त्यांची एक पुत्री एवढेच आत्मीयजन होते. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले आणि पित्याची सेवा करण्यासाठी पुत्रीने लग्नच केले नाही. दुर्दैव असे की त्यांना जपणारी त्यांची लेकही अल्पशा आजाराने अकाली निधन पावली. मुलगी असेपर्यंत त्यांनी नागपुरातच वास्तव्य केलेले होते. या शहरात राहूनच त्यांनी पर्यावरण आणि वने यांच्यावर २५ पुस्तकांचे लेखन केले. त्यांनी पक्षीकोश लिहिला. वन्य प्राणीकोश याचेही काम पूर्ण झालेले आहे. मत्स्यकोशाचे काम ते करीत होते. वृक्षकोशाची संहिता पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले होते. म्हणजे हा वनयोगी केवळ वनाचे चिंतन करीत नव्हता. तर आपले प्रत्येक पुस्तक अभ्यासपूर्ण आणि सर्वांग दृष्टीने परिपूर्ण राहील, याकडेही ते बारीक लक्ष देत असायचे. त्यांनी जे साहित्य निर्माण केले आहे. ते पाहिल्यावर भविष्यात मारुती चितमपल्ली नावाचा एक लेखक होता की अनेक लेखक होते. असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यांनी ज्या खात्याला आयुष्यभर सेवा दिली. त्या वनविभागाने त्यांना पद्मश्री देताना ज्या आवश्यक बाबी असतात, त्याची परिपूर्ती केली नाही, ही मोठी खेदाची बाब आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना पद्मश्री मिळाली. तेव्हाच त्यांची तब्येत ठीक नव्हती. वनाची ३६ वर्ष सेवा केल्यानंतरही ते २९ वर्ष जंगलातच राहिले. आपले पुतणे श्रीकांत यांनी त्यांना दिल्लीला नेले. तेव्हाही त्यांची प्रकृती तोळामासाच होती. शेवटी सोलापूरला परत आल्यावर त्यांची तब्येत जास्त खालावली. शेवटपर्यंत वाचन आणि लेखनात दंग असलेल्या या अरण्यऋषीने आपल्या पुतण्याला आपली इहलोकीची यात्रा संपविण्यापूर्वी जाण्याची परवानगी मागितली आणि ते निघून गेले. त्यांना राज्य शासनासह विविध संस्थांनी अनेक महनीय पुरस्कार दिले. भारती विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार, नागपूरचा अतिशय महत्त्वाचा नागभूषण पुरस्कार, खासदार एन. डी. पाटील समाजसेवक पुरस्कार, रानवाटा या पुस्तकाला उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार, भैरू रतन दमानी साहित्य पुरस्कार, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार यासह इतर अनेक पुरस्कारांनी मारुती चितमपल्ली यांना नव्हे. तर स्वतःच्या पुरस्कारांनाच अनेकांनी गौरवान्वित केले. सर्व पुरस्कारांची जंत्री द्यायची झाली. तर जागाच पुरणार नाही. त्यांनी केलेली कोश वांङ्मयाची निर्मिती हे त्यांनी मराठी भाषेला दिलेले शब्दांचे धन आहे. त्यांनी निरनिराळ्या श्वापदांना, पाखरांना, वेगवेगळ्या प्राण्यांना दिलेली मराठी नावे आणि वैविध्यपूर्ण प्राणीसृष्टी त्यांच्या लेखनात पानोपानी जाणवते. वन्यजीव आदिवासींची संस्कृती आणि त्यांचे नैसर्गिक जीवन, आदिवासींची मालकी असलेली सृष्टीची रहस्यं अशा प्रकारच्या ललित लेखनातून वाचकांना त्यांनी संमोहित करून टाकलेले होते. हे वनज्ञान ऋषी ज्या ज्या भागात गेले. त्या त्या भागातील आदिवासींच्या भाषा ते मनोमन शिकले. हे त्यांचे बहुभाषाविध ज्ञानोपासक लेखन त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देते. वनखात्यात सेवा देताना त्यांनी मराठी भाषेच्या वृद्धीसाठी अहर्निश लेखन केले. वनखात्यात नोकरी म्हणजे श्रीमंतीचा राजमार्ग असे म्हटले जाते. मात्र या अरण्य ऋषींनी मराठी भाषेची श्रीमंती वाढवली. गोनिदां म्हणजेच गो. नि. दांडेकर मोठे वनप्रेमी साहित्यिक होते. दांडेकरांनी त्यांना प्रेरणा दिली. विद्वत्तरत्न नरहर कुरुंदकर, पक्षीमित्र डॉक्टर सलीम, सत्यकथाकार राम पटवर्धन यांच्यासह शीर्षस्थ कथाकार जीए म्हणजेच जी. ए. कुलकर्णी वगैरे अनेकांनी त्यांना प्रोत्साहित केले. वनप्रेमी असलेले नवेगाव बांध येथील माधवराव पाटील- डोंगरवार हे त्यांचे अत्यंत जिवलग स्नेही होते. माधवरावांच्या वाड्यात चितमपल्ली वारंवार कुटुंबासह येत असत. येथेच त्यांनी पक्षीकोश निर्माण केला होता. त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेक आदिवासी तरुणांशी घट्ट मैत्री केली होती. नवेगाव बांध येथेच त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. गोंदिया जिल्ह्यातील हा भाग विविध पक्षांच्या किलबिलाटाने नेहमीच गजबजलेला असायचा. दररोज शिकार करणाऱ्या आदिवासींनी त्यांच्या संगतीत आल्यावर आपल्याकडील ३६ बंदुका मारुती चितमपल्ली यांच्याकडे सोपवल्या. यावरून त्यांच्या आणि आदिवासींच्या परस्पर संबंधाची कल्पना सहज येऊ शकते. वनाशी संबंधित या विद्यावाचस्पती बद्दल सर्वांनाच आत्मीयता होती. अशा प्रकारे मराठी भाषा समृद्ध करणाऱ्या महान लेखकाला केवळ एकटेपण आल्यामुळे नागपूर सोडावे लागले. ही जिव्हारी लागणारी बाब आहे. पाच वर्षांपूर्वी त्यांनी आपले जन्मगाव सोलापूर येथे प्रयाण केले आणि काल अत्यंत समाधानी जीवन जगलेले मारुती चितमपल्ली पंचत्वात विलीन झाले. त्यांच्या व्यासंगी साहित्याला आणि मराठी भाषेची शब्दसंपदा समृद्ध करणाऱ्या या वनविद्या वाचस्पतीला आमची साश्रू नयनांनी शोकांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखची

# वर्ल्ड नंबर १ वर मात




■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
नागपूर येथील १९ वर्षीय दिव्या देशमुखने जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाची बुद्धिबळपटू हौ यिफानचा पराभव केला.

ज्युनियर गटात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या दिव्याने चीनच्या हौ यिफानचा पराभव केला आणि जागतिक टीम रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत ३ पदके जिंकली. यामध्ये रॅपिड बुद्धिबळात रौप्य आणि ब्लिट्झमध्ये कांस्यपदकांचा समावेश आहे.

लंडनमध्ये पार पडलेल्या एफआयडीई वर्ल्ड ब्लिट्झ टीम बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यात नागपूरच्या दिव्याचा सामना यिफानशी झाला. हा सामना बुद्धिबळाच्या सर्वात वेगवान स्वरूपात होता, यिफानने डब्ल्यूआर बुद्धिबळ संघाचे प्रतिनिधित्व केले, तर दिव्या हेक्सामाइंड बुद्धिबळ क्लबकडून खेळली.

यिफानने पहिल्या टप्प्यात दिव्याचा पराभव केला. पण दुसऱ्या टप्प्यात दिव्याने शानदार पुनरागमन केले. पांढऱ्या सोंगट्यांसह खेळताना, दिव्याने सुरुवातीच्या आघाडीचा फायदा घेतला आणि जलद चाली करून वेळेत नियंत्रण मिळवले.

१९ वर्षीय दिव्याने ब्लिट्झमध्ये कांस्य आणि रॅपिडमध्ये रौप्यपदक जिंकले. वैयक्तिक गटात तिला रॅपिडमध्ये रौप्य आणि ब्लिट्झमध्ये कांस्यपदक मिळाले. हा दिव्याचा हौ यिफानविरुद्धचा पहिला विजय होता. १५ जून रोजी लंडनमधील नोवोटेल वेस्ट येथे झालेल्या या सामन्यात दिव्याच्या कामगिरीचे कौतुक केले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्याचे कौतुक करीत सोशल प्लॅटफॉर्मवर लिहिले आहे की, 'लंडनमधील वर्ल्ड टीम ब्लिट्झ चॅम्पियनशिपच्या दुसऱ्या टप्प्यातील ब्लिट्झ सेमीफायनलमध्ये जगातील नंबर १ खेळाडू हौ यिफानला हरवल्याबद्दल दिव्या देशमुखचे अभिनंदन. तिचे यश तिच्या संयम आणि दृढनिश्चयाचे प्रतिबिंब आहे. हे अनेक उदयोन्मुख बुद्धिबळ खेळाडूंना देखील प्रेरणा देते. तिच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा.'

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिव्याचे यश नवीन बुद्धिबळपटूंना प्रेरणादायी असल्याचे म्हणत तिचे अभिनंदन केले आहे. अनेक मान्यवरांनीही तिचे कौतुक केले आहे.

# घातवार, १४ ठार!

## तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये अनेकजण जखमी



■ **महासागर प्रतिनिधी/वृत्तसंस्था**
**मुंबई, पुणे, सारंगपूर, दि. १९ :**
राज्यातील ठाणे (मुंबई) आणि पुणे जिल्ह्यासह मध्यप्रदेशात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात १४ जण ठार तर अनेकजण जखमी झालेत.

पुणे जिल्ह्यातील जेजुरी -जेजुरी मोरगाव रोडवर किर्लोस्कर कंपनी जवळील श्रीराम ढाबा समोर स्विफ्ट कार आणि पिकअप टेम्पोमध्ये भीषण अपघात झाला. या अपघात ८ जण जागीच ठार, तर पाच जण गंभीर जखमी झाले.

जेजुरीहून मोरगावकडे भरधाव वेगाने जात असलेली स्विफ्ट डिझायर कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पिकअप टेम्पोला धडकली. अपघातावेळी टेम्पोमधून सामान उतरवण्याचे काम सुरू होते. ही कार टेम्पोच्या बाजूला असलेल्या दुसऱ्या कारवर आदळली.

अपघातात टेम्पो मधील वस्तू खाली करणारे दोघेजण, श्रीराम ढाब्यासमोर उभे असणारे तिघे तर कार मधील तिघे जण जागेवरच ठार झाले. सोमनाथ वायसे, रामु संजीवन यादव (दोघेही रा. नाझरे कप ता. पुरंदर), अजय चव्हाण (रा. उत्तरप्रदेश) अजित जाधव (रा. कांजळे, ता. भोर), किरण राऊत, अक्षय राऊत, अश्विनी ऐसार, अशी मृतांची नावे असून अन्य एकाची ओळख पटली नाही. दोन मुले, एक महिला, दोन पुरुष अशा पाच जणांची प्रकृती गंभीर आहे.

**ट्रक-जीप धडकेत २ ठार**

ठाणे जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर वाशिंद आणि आमणे दरम्यान क्रुझर जीप आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत.

परभणी जिल्ह्यातील एक कुटुंब चारचाकीने भिवंडीच्या नातेवाईकांकडे येत होते. या वाहनाने समोर जात असलेल्या ट्रकला धडक दिली. त्यात २ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर ७ गंभीर जखमी झाले.

मृतांमध्ये अब्दुल पाशा शेख (६५) आणि जाहीद सिद्दिकी (४०) यांचा समावेश आहे. अपघातग्रस्तांमध्ये २ लहान मुले, ३ महिला आणि २ पुरुषांचा समावेश असून प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

अमेरिकेला पाठवला जाणार

## ड्रीमलायनरचा ब्लॅक बॉक्स

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १९ :**
१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाचा ब्लॅक बॉक्स तपासासाठी अमेरिकेला पाठवला जाऊ शकतो.



विमानात आग लागल्यानंतर ब्लॅक बॉक्स इतका खराब झाला आहे की त्यातून डेटा मिळवणे कठीण झाले आहे. त्यामुळे तो तपासासाठी अमेरिकेला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय केंद्र सरकारने घ्यायचा आहे.

१२ जून रोजी लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय-१७१ अहमदाबाद येथे उड्डाणानंतर लगेचच कोसळले. या घटनेत विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला, तर एक प्रवासी बचावला. या घटनेत एकूण २७५ जणांचा मृत्यू झाला. ब्लॅक बॉक्सचे दोन भाग - कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर उष्णता आणि आगीमुळे खराब झाले. देशात अशी कोणतीही प्रयोगशाळा नाही जिथे डेटा पुनर्प्राप्त करता येईल. या कारणास्तव, आता त्यांना अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाच्या प्रयोगशाळेत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुरक्षा आणि गोपनीयता राखण्यासाठी सरकारी अधिकारी त्यांच्यासोबत असतील.

आतापर्यंत अहमदाबाद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या २११ जणांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे आणि १८९ मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले आहेत.

## लुटियन्स झोनमधील सुनहरी बाग राहुल गांधींचा नवा पत्ता

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :**
लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा आज ५५ वा वाढदिवस आहे. आज राहुल सुनहरी बाग रोडवर बांधलेल्या टाइप-८ बंगल्यात स्थलांतरित झाले आहेत. हा बंगला त्यांना लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून देण्यात आला आहे.

५५ व्या वाढदिवशी शिफ्ट



संसदीय गृहनिर्माण समितीने त्यांना ५ सुनहरी बाग रोड, ७ मोतीलाल नेहरू मार्ग आणि ३ कृष्णा मेनन मार्ग बंगल्यांचा पर्याय दिला होता. यापैकी राहुल यांनी सुनहरी बाग निवडली. यापूर्वी राहुल गांधी सोनिया गांधींसोबत १० जनपथ येथे राहत होते. २०२३ मध्ये त्यांनी १२ तुघलक लेन येथील बंगला रिकामा केला, जो १९ वर्षांपासून त्यांच्याकडे होता.

## आई आणि मुलासह ४ जणांचा मृत्यू



मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील पाचोर येथे महामार्गावर एक कार दुभाजकाला धडकली. अपघातात कारमधील दोन मुलांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघांचा शाजापूर जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. तीन जण जखमी झाले आहेत. कारमधील सर्व लोक अयोध्याहून सुरतला जात होते. राजगडमध्ये चालकाला झोप लागली, ज्यामुळे हा अपघात झाला. अहमदाबादला जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा चालक आणि ट्रक चालकांनी गाडीचा दरवाजा तोडून मृतदेह आणि जखमींना बाहेर काढले.

## इराणच्या अणुभट्टीवर इस्त्रायलचा हल्ला : इराणने इस्त्रायली स्टॉक एक्सचेंज उडवले

१७६ जखमी; आतापर्यंत ६३९ इराणी नागरिकांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, तेहरान, दि. १९ :**
इस्त्रायलने इराणमधील अरक हेवी वॉटर रिॲक्टरवर हल्ला केला आहे. हल्ल्यानंतर झालेल्या नुकसानीची कोणतीही माहिती नाही.

काही तासांपूर्वी इस्त्रायली आर्मीने अरक आणि खोंडूब शहरांतील लोकांना हा परिसर रिकामा करण्याचा इशारा दिला होता.

अरकमध्ये एक हेवी वॉटर रिॲक्टर आहे. ही सुविधा इराणच्या अणुकार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग आहे. यासोबतच अरकमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रे तयार केली जातात.

याशिवाय, खोंडूबमध्ये एक हेवी वॉटर रिॲक्टर देखील आहे, जो इराणच्या अणुकार्यक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. ही सुविधा अरकपासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर आहे. अरकप्रमाणेच, त्यावर आंतरराष्ट्रीय देखरेख देखील ठेवण्यात आली आहे.

इराण आणि इस्त्रायलमधील युद्ध सातव्या दिवशी पोहोचले आहे. आतापर्यंत इस्त्रायलमधील २४ लोक मारले गेले आहेत. त्याच वेळी, वॉशिंग्टनस्थित एका मानवाधिकार गटाने दावा केला आहे की इराणमध्ये मृतांची संख्या आता ६३९ वर पोहोचली आहे आणि १३२९ लोक जखमी झाले आहेत. दोन्ही देशांमधील युद्ध भीषण रूप धारण करीत आहे.

## दोन विमानांचे आपत्कालीन लॅंडिंग

दिल्लीहून लेहला जाणारे इंडिगोचे विमान ६ ए २००६ हे तांत्रिक बिघाडामुळे गुरुवारी सकाळी दिल्लीला परतले. विमानात क्रू मेंबर्ससह १८० लोक होते.

याशिवाय, स्पाइसजेटचे विमानही उड्डाणानंतर १० मिनिटांनी परतले. हे विमान हैदराबादहून तिरुपतीला जात होते. विमानात एकूण ८० प्रवासी होते.

यापूर्वी बुधवारी एअर इंडियाची ३ उड्डाणे रद्द करण्यात आली होती. यामध्ये दिल्ली-बाली, टोरंटो-दिल्ली आणि दुबई-दिल्ली उड्डाणे यांचा समावेश होता.

सर्वप्रथम, दिल्लीहून बालीला जाणारे विमान एआय २१४५ मध्यातूनच दिल्लीला परतले. बाली विमानतळाजवळ ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याच्या वृत्तांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे एअरलाइनने म्हटले आहे.

यानंतर, टोरंटोहून दिल्लीला जाणारे विमान एआय १८८ रद्द करण्यात आले. आधीच विमानात बसलेल्या प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. विमानाच्या देखभालीमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या उड्डाण कर्तव्याच्या वेळेच्या मर्यादेमुळे ते रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## काँग्रेस नेतृत्वातील काही लोकांशी मतभेद

■ **वृत्तसंस्था, तिरुवनंतपुरम, दि. १९ :**
काँग्रेस खासदार शशी थरूर म्हणाले की, त्यांचे पक्षातील काही नेत्यांशी मतभेद आहेत. थरूर गुरुवारी तिरुवनंतपुरममध्ये पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, मी ज्या लोकांबद्दल बोलत आहे ते कोण आहेत. तुम्ही (मीडियाचे लोक) त्यांना चांगले ओळखता कारण त्यातील काही मुद्दे सार्वजनिक क्षेत्रात आहेत.



थरूर पुढे म्हणाले की, त्यांना काँग्रेस पक्ष आणि त्यांची तत्वे आवडतात. त्यांनी १६ वर्षांपासून पक्ष कार्यकर्त्यांसोबत जवळून काम केले आहे आणि ते त्यांना आपले जवळचे मित्र आणि भाऊ मानतात. थरूर यांनी त्यांचे मतभेद राष्ट्रीय नेत्यांशी आहेत की राज्य नेत्यांशी आहेत हे स्पष्ट केले नाही.

वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग

## आयआयटी दिल्ली सर्वोत्तम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ जाहीर झाले आहे. गेल्या वर्षीप्रमाणे, मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजेच एमआयटी यामध्ये अव्वल स्थानावर आहे.

यावर्षी रँकिंगमध्ये काही बदल झाले आहेत. यावर्षी आयआयटी दिल्ली देशात पहिल्या स्थानावर आहे. तर आयआयटी बॉम्बे दुसऱ्या स्थानावर आहे. या वर्षी देशातील ५४ विद्यापीठे आणि संस्थांना या यादीत स्थान मिळाले आहे, जे आतापर्यंतचे सर्वोच्च आहे. गेल्या वर्षी भारतातील ४६ विद्यापीठे आणि संस्थांना या यादीत स्थान मिळाले होते.

या वर्षी आयआयटी बॉम्बेला १२९ वा रँकिंग मिळाला आहे, तर गेल्या वर्षीच्या रँकिंगमध्ये ते ११८ व्या क्रमांकावर होते. याशिवाय, गेल्या वर्षी आयआयटी बॉम्बेला देशात पहिले स्थान मिळाले होते. या वर्षी आयआयटी दिल्ली पहिल्या क्रमांकावर आहे.

## अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्यावर अंत्यसंस्कार



■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १९ :**
पद्मश्री सन्मानित, पर्यावरण आणि वन्यजीव लेखक 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ लेखक आणि माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर आज गुरूवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

बुधवार १८ जून रोजी रात्री त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरमधील त्यांच्या राहत्या घरी सायंकाळी सात वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण आणि साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मारुती चितमपल्ली यांना ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मात्र, दिल्लीहून परतल्यानंतरच त्यांची प्रकृती खालावली होती. ते अंथरुणाला खिळले होते. गेल्या दहा दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग केला होता व केवळ दूध व थोडेसे पाणी घेत होते.

त्यांचे वास्तव्य अक्कलकोट रोडवरील सूत मिल हेरिटेज, मनिधारी एम्पायर सोसायटी येथे होते. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी दुपारी घरापासून निघून रूपाभवानी मंदिराजवळील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आलेत.

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या निधनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला.

प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचक पक्षीशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक अशी मारुती चित्तमपल्ली यांची ओळख आहे. मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. या भटकंतीत ५ लाख किमी प्रवास, १३ भाषांचे ज्ञान याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या व ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत.

डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षिकोश, प्राणिकोश व मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केले. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी २५ पुस्तके लिहिली. अनेक वर्ष ते विदर्भातील नवेगाव बांध येथे वास्तव्यास होते.

# ज्यांना राजकारणात मुले होत नाहीत...

वर्धापनदिन मेळाव्यात उद्धव ठाकरे गरजले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसेनेचा वर्धापन दिन सोहळा सायन येथील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शिंदेसेनेसह भाजपावर सडकून टीका केली.




आज सगळीकडे लागलेल्या बॅनरवर शिवसेना प्रमुखांचे फोटो आहेत. जे आपला बाप बदलाल आणि ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत, अशी लोक आपल्या घराणेशाहीवर टीका करतात, तेव्हा मला त्यांची कीव येते. तुला राजकारणात पोरं होत नाहीत, त्याला आम्ही काय करू. आमच्याकडे आहेत, घ्यायची तर घे. किती पाहिजेत? कारण भाजप असाच आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला.

निवडणूक जिंकण्यासाठी माता भगिनीशी केलेला वादा, जनतेशी केलेला वादा पाळत नाही. मग तो पक्ष माझ्याशी केलेला वादा कसा पाळतील. आज देशाला पंतप्रधानांची गरज आहे. भाजपला पंतप्रधान आहे. देशाला नाही.

आज ज्यांना दाढी फुटली आणि दाढी खाजवत आहेत, ते शिवसेनेच्या पहिल्या मेळाव्यात कुठे असतील याची मला कल्पना नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना टोला लगावला.

# वेगाने रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पाहिला...

एकनाथ शिंदे यांची जहरी टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा मेळावा वरळीतील एनएससीआय डोम येथे पार पडला. एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता जहरी टीका केली.



उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी लाचार झाले. त्यांनी हिंदुत्व बाजूला सोडून दिलं. महाराष्ट्रातील जनतेशी प्रतारणा केली. मतदारांना धोका दिला. उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी अगतिक, लाचार झाले, त्यांना पुन्हा हिंदुत्व, मराठी माणूस आठवत आहे, असा हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी केला. मतदारांनी ठाकरे गटाला कधीच टाटा-बाय-बाय केलंय. आपल्याकडे आत्मविश्वास आहे. त्यांच्याकडे अहंकार आहे. हा अहंकार त्यांना विनाशाकडे नेतोय. सरडाही रंग बदलतो. पण इतक्या वेगाने रंग बदलणारा सरडादेखील महाराष्ट्राने पाहिला. त्यांचेच सगेसोयरे, भाऊबंद हे सांगत आहेत, अशी थेट टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

मुख्यमंत्रिपदासाठी ते लाचार झाले. ते काय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचे वारसदार होणार? बाळासाहेब असते तर खुर्चीसाठी लाचार लोकांना त्यांनी उलटं टांगून खालून मिरचीचा धूर दिला असता. हिंदुत्व आणि मराठी माणसाशी विश्वासघात केल्यामुळे ते आता उतावीळ, लाचार झाले आहेत, अशी थेट टीकाही शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

कार्यक्रमादरम्यान खासदार मिलिंद देवरा आणि श्रीकांत शिंदे यांची मुलाखत घेण्यात आली. या दोघांनीही ठाकरे गटावर शरसंधान साधले.

# 'मातोश्री'वर सध्या बंगाली बाबाचा वावर : संजय शिरसाट



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदास संजय राऊत यांनी कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्यावर केलेला अघोरी पूजेचा आरोप सत्ताधारी शिवसेनेने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. भरत गोगावले हे पूजापाठ करणारे आहेत. पण मातोश्रीचे बंगाली बाबा कनेक्शन काय आहे हे संजय राऊतांनी सांगावे. मातोश्रीवर रोज एका बंगाली बाबाचा वावर असतो. या बाबाच्या सूचनेनुसार उद्धव ठाकरे यांचे सर्वकाही ठरते, असे शिवसेना नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. सध्या भरत गोगावले यांचा एक अघोरी पूजा करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ठाकरे गटाचे पदाधिकारी वसंत मोरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. संजय राऊत यांनी या व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला होता. अघोरी विद्येमध्ये रममान असणारे मंत्री महाराष्ट्राचे काय भले करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. पत्रकारांनी याविषयी गुरूवारी संजय शिरसाट यांना छेडले असता त्यांनी गोगावलेंवरील टीका धुडकावून लावली. तसेच संजय राऊतांना मातोश्रीचे बंगाली बाबा कनेक्शन सांगण्याचे आव्हानही दिले. संजय शिरसाट म्हणाले, व्हायरल व्हिडिओद्वारे भरतशेठ गोगावले हे पूजापाठ करणारे असल्याचे महाराष्ट्राला कळ्ले. अघोरी पूजा अशी कॅमेऱ्यावर होत नाही.

# सोलापूर महानगरपालिकेतील कामगारांना नियमित करण्यासाठी प्रस्ताव पाठवा : अण्णा बनसोडे



**मुंबईः** सोलापूर महानगरपालिकेतील विविध खात्यांमध्ये १९९५ नंतर रुजू झालेल्या पण नियमित न झालेल्या कामगारांच्या सेवा नियमित करण्यासाठी महानगरपालिकेने ठरावासह परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठवावा, अशा सूचना विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिल्या. विधिमंडळात उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे दूरदृश्य प्रणालीद्वारे तसेच अतिरिक्त आयुक्त रवी पवार, नगरविकास विभागाचे अवर सचिव वाणी, कामगारांचे प्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत जवळपास २४९ कामगार नियमित करण्यात आलेले नाहीत. महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेच्या पुढे गेला असल्याने अहवाल पाठविण्यात आला होता. परंतु या कामगारांना नियमित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव ठरावासह शासनास पाठवण्यात यावा, असे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

# देशात डी कंपनीचे राज्य, डरपोकांची सत्ता
## संजय राऊत यांचा आरोप



**मुंबई :** देशामध्ये आज डी कंपनीचे राज्य सुरू आहे. भाजपचे म्हणजे डरपोक म्हणजे डी कंपनीचे राज्य आहे. महाराष्ट्रात खरोखरची डी कंपनी आहे त्यांचे राज्य आहे. दाऊदपासून ते मिर्चीपर्यंत अनेक गुंड आणि त्यांचे हस्तक देशद्रोही यांना सोबत घेऊन डी कंपनी महाराष्ट्रात राज्य करत आहे, असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी महायुतीवर हल्लाबोल केला आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, एका ठिकाणी प्रत्यक्ष दाऊद आणि एका ठिकाणी डरपोक लोकांचे राज्य आहे. या दोन डी विरुद्ध शिवसेना हा एकमेव पक्ष ताकदीने लढत आहे. आमच्या पाठीवर वार करत काही लोकं निघून गेले पण आम्ही छातीवर वार सहन करत लढणाऱ्यांचा हा पक्ष आहे, असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे संस्थापक अमित शहा आहेत. त्यांचा आणि बाळासाहेब ठाकरे यांचा काही संबंध नाही. त्यांनी त्यांच्या पक्षाचा वर्धापनदिन हा सुरत, अहमदाबादमध्ये साजरा करायला हवा, असा टोला राऊतांनी लगावला आहे. अमित शहा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे की मराठी माणसांच्या एकजुटीला तडे जावे. त्यांच्यामध्ये भ्रम निर्माण व्हावा.

# अजित दादांना पदाची हाव नाही : हसन मुश्रीफ



**मुंबई :** सहकार क्षेत्र पारदर्शक ठेवा, बदनामीची संधीच उरू देऊ नका, असा स्पष्ट सल्ला देत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी अनेक मुद्द्यांवर परखड भूमिका मांडली. माळेगावच्या सहकारी संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. यावेळी त्यांनी अजित पवार, जयंत पाटील, तटकरे, शिवसेना युती आणि राष्ट्रवादीतील दुही यावर थेट भाष्य करत राजकीय वतुर्ळात खळबळ उडवून दिली. हसन मुश्रीफ म्हणाले, अजित दादांनी पूर्वी अनेक पदांचा त्याग केला आहे. त्यांना पदासाठी राजकारण करायचं नाही. माळेगावच्या सहकारी निवडणुकीतून देशासमोर आदर्श निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सहकारी संस्था कशा पारदर्शकपणे चालवाव्यात याचा दादा आदर्श देऊ इच्छितात. अजित पवारांविरोधात सहकार क्षेत्रात अनेक आरोप केले जात आहेत. यावर प्रतिक्रिया देताना मुश्रीफ म्हणाले, "ही सगळी बदनामी करण्याची योजना आहे. विधानसभा निवडणुकीत दादांनी एक लाख मताधिक्याने विजय मिळवला होता, हे विसरू नका." शिवसेनेसोबतच्या युतीबाबत विचारले असता, "आम्हाला त्याबद्दल काही माहिती नाही," असे सांगत त्यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदावरील वादात मुख्यमंत्री लवकरच तोडगा काढतील.

# पवार कुटुंब म्हणजे दरोडेखोरांची टोळी
## लक्ष्मण हाकेंचा सवाल



**पुणे :** यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेण्याचा अधिकार उपमुख्यमंत्री अजित पवार किंवा पवार कुटुंबियांना आहे का? या प्रश्नाचे उत्तर मिळणे गरजेचे आहे, असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. तर मी नेहमी म्हणतो की अजित पवार हे कारखानदारांचे नेते आहेत. ही लुटारुंची टोळी आहे. यात सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. लक्ष्मण हाके म्हणाले की, अजित पवारांकडून लोकशाहीचा खून पाडण्याचे काम होत आहे. ते राज्याचे उपमुख्यमंत्री असताना त्यांना केवळ माळेगाव सहकारी साखर कारखाना निवडणुकीत रस आहे. हे निवडणुका जिंकण्याचे अड्डे बनले आहेत. अजित पवार अर्थमंत्रीपदावर यासाठीच राहतात कारण ते राज्याच्या तिजोरीवर दरोडा टाकतात आणि यांच्या संस्थांना मोठे करतात.

लक्ष्मण हाके म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत असाच गैरप्रकार झाला होता. अशाच रात्री-अपरात्री बँका उघड्या राज्याने पाहिल्या होत्या. जरी लोकं सात्यत्याने निवडून येतात ना ती जनभावनेवर नाही तर अशा काळ्याकृत्यावर निवडून येत असतात.

# विचाराधीन बंद्यांना न्यायाचा मार्ग दाखवणारा विधी साहाय्य उपक्रम : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**

कारागृहांमधील विचाराधीन बंद्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये सुरू केलेल्या देशातील पहिल्या विधी सहाय्य उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जवळपास २० हजार विचाराधीन बंद्यांना लाभ झाला आहे. त्यापैकी ९ हजार म्हणजेच ४५ टक्के बंदी विविध कायदेशीर प्रक्रियांद्वारे मुक्त करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे महत्व म्हणजे, केंद्र शासनाने देश पातळीवर हा उपक्रम स्वीकारला असून अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूदही केली आहे.

प्रिझन स्टॅटिस्टिक्स इंडिया रिपोर्ट २०२१नुसार, भारतातील कारागृहांमधील बंद्यांचा सरासरी दर १३० असून त्यामध्ये




सुमारे ७७ टक्के बंदी हे विचाराधीन (अंडर ट्रायल) आहेत. या बंद्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत उद्योगपती अजीम प्रेमजी यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करीत देशातील पहिला विधी साहाय्य उपक्रम सुरू केला.

कायदेशीर प्रतिनिधीत्वाच्या अभावामुळे किंवा जामीन घेण्याची आर्थिक क्षमता नसल्यामुळे अजूनही शिक्षा न ठरलेले बंदीजन आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे विचाराधीन बंदी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करीत आहेत.

विचाराधीन बंदीगृहातील बंद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने अजीम प्रेमजी फाउंडेशन आणि अंमलबजावणी भागीदार टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टी आय एस एस ) आणि राष्ट्रीय विधी विद्यापीठ, दिल्ली यांच्या सहकार्याने सुरू केलेल्या विधी साहाय्य उपक्रमाने राज्यभरात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातील आर्थर रोड, भायखळा, कल्याण, तळोजा, लातूर, ठाणे, पुणे आणि नागपूर या आठ प्रमुख कारागृहात प्रभावीपणे राबविला जात आहे.

या ठिकाणी सामाजिक कार्य व कायदा फेलोज यांची नेमणूक कारागृहांमध्ये तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांमध्ये करण्यात आली आहे. हे तज्ज्ञ बंद्यांना प्रकरणाच्या तयारीसाठी, न्यायालयीन प्रक्रियेत मार्गदर्शन करतात आणि प्रभावी विधी प्रतिनिधित्व मिळवून देतात.

या उपक्रमामुळे विधी साहाय्य व्यवस्थेत मूलभूत सुधारणा झाल्या असून सेवांमध्ये समन्वय वाढला आहे. दुर्बल व संवेदनशील बंद्यांसाठी न्यायाची उपलब्धता सुधारली आहे आणि धोरणात्मक स्तरावरही महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. या यशस्वी उपक्रमामुळे राज्य शासनाने अजीम प्रेमजी फाउंडेशनसोबतच्या सामंजस्य कराराचे नूतनीकरण केले आहे. या उपक्रमाचा दीर्घकालीन पद्धतीने राबवीत विस्तार करण्यात येत आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

माहिती व्यवस्थापन बळकट करणे, कारागृह विधी ' क्लिनिक' ची कार्यक्षमता वाढवणे आणि संस्थात्मक क्षमता वृद्धिंगत करणे यावर पुढील टप्प्यात भर दिला जाणार आहे. या पुढाकारामुळे गृह विभागाच्या महाराष्ट्र राज्य कारागृह सुधारणा शाखेने विधी साहाय्य व सुलभता या क्षेत्रात देशासाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

# मुंबईकर महिलेवर पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप ठेवून २२ लाखांना फसवले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**

ऑनलाईन फसवणुकीला बळी पडल्यामुळे अनेकांचं लाखोंचं तर काहींचं कोट्यवधींचं नुकसान होत असल्याच्या घटना गेल्या काही काळात समोर आल्या आहेत. यात वेबसाईटवरील लिंकच्या माध्यमातून फसवणूक करण्यापासून फोनवर कार्डचा किंवा बँक व्यवहाराचा ओटीपी मागण्यापर्यंत अनेक मार्गांचा समावेश आहे. पण आता या ऑनलाईन फसवणुकीचा नवा प्रकार समो आला आहे. मुंबईत एका वृद्ध महिलेला चक्क पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप करून तब्बल २२ लाखांना गंडा घातल्याची बाब नुकतीच समोर आली आहे. अशा प्रकारे हेरगिरीचा आरोप करून फसवूक केल्याचा हा पहिलाच प्रकार मानला जात आहे.

मुंबईत एका ६४ वर्षांच्या वृद्ध महिलेची पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप करून तब्बल २२ लाख ४० हजारांची फसवणूक केली आहे. बुधवारी हा प्रकार समोर आला आहे.

सदर महिला गिरगावमध्ये वास्तव्यास असून आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच या महिलेनं गेल्या आठवड्यात यासंदर्भात साऊथ रीजन सायबर पोलिसांकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली. त्यानंतर बुधवारी मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनंतर हे सगळं प्रकरण चर्चेत आलं आहे. ५ ते १० जून यादरम्यान हे सर्व फोन कॉल्स आणि फसवणूक झाल्याचं या महिलेनं तक्रारीत म्हटलं आहे.

सदर महिलेनं दिलेल्या तक्रारीनुसार, काही अनोळखी क्रमांकांवरून त्यांना फोन आले. आपण दिल्ली एटीएस अर्थात दहशतवादविरोधी पथकाचे अधिकारी प्रेम कुमार गुप्ता बोलत असल्याचं पलीकडील व्यक्तीने सांगितलं. तसेच, आपण जम्मू-काश्मीर बॉर्डर पोलीस स्थानकात सध्या रुजू असल्याचंही या व्यक्तीने सांगितलं.

# आदिवासींचा निधी अन्यत्र वळवण्यास विरोध
## आदिवासी आमदारांनी घेतली राज्यपालांची भेट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**

अर्थसंकल्पात अनुसूचित जमाती अर्थात आदिवासी समाजाच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेला निधी अन्यत्र वळवण्यास आदिवासी आमदारांनी तीव्र विरोध केला आहे. या आमदारांचा रोख मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे आहे. यासंदर्भात सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांनी बुधवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन आदिवासी विकास निधी आदिवासींच्या योजनांसाठीच वापरावा, अशी आग्रही मागणी केली.

राज्य सरकारने आपल्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीला हात घेतला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाकडून दर महिन्याला ३३५ कोटी ७० लाख रुपये घेतले जातात. या पार्श्वभूमीवर अन्न औषध प्रशासन नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाजाच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने आज राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली. त्यावेळी राज्यपालांनी आदिवासी विकासासाठीचा राखीव निधी आदिवासी विकास योजनांसाठीच वापरला जावा. आदिवासींसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ आदिवासींनाच व्हावा, बोगस आदिवासी प्रमाणपत्रधारकांवर कडक कारवाई करावी तसेच पेसा भागांच्या विकासावर विशेष लक्ष देण्यासंदर्भात आपण आग्रही असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिनस्त राहून पेसा भागात आदिवासी कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असे आश्वासन आमदारांना दिले.

यावेळी पेसा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या भरती संदर्भात सध्याच्या आदेशातील विसंगती दूर करणे, अवैधरित्या जात प्रमाणपत्र रोखण्यासंदभार्तील कायदा करणे, आदिवासी विद्यापीठाची स्थापना करणे, प्रलंबित वनदावे निकाली काढणे यांसह विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक वर्षातून किमान दोनदा व्हावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

आदिवासी मुले, मुली मुंबई आणि पुण्यात शिक्षणासाठी येतात. त्यांच्या वसतिगृहांसाठी मुंबई, पुण्यातील विद्यापीठ परिसरात जागा उपलब्ध करून दिल्यास आदिवासी विकास विभाग वसतिगृहे बांधून देईल, अशी माहिती आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी राज्यपालांना दिली.

तर राज्यपाल हे राज्यातील आदिवासी भागांचे पालक असल्याने त्यांनी राज्यातील आदिवासी लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची प्रत्येक विधानमंडळाच्या सत्राच्या वेळी बैठक घ्यावी, अशी विनंत झिरवाळ यांनी यावेळी केली.

# पुणे, रायगड, नाशिक येथे पावसाचे धूमशान

■ **महासागर प्रतिनिधी, रायगड, दि. १९ :**

कोकण पट्ट्यातील रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू झाला आहे. परिणामी, जिल्ह्यातील खेड व नागोठणे शहरात पूरस्थिती उद्भवली आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली असून, नदीचे पाणी थेट शहरातील मार्केट परिसरात शिरले आहे. मुसळधार पावसामुळे जिल्हा प्रशासनाने शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यात पावसाची संततधार कायम असल्यामुळे खडकवासला धरणातून 2 हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. परिणामी, पाली पोलिस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली - खोपोली रोडवर नदीचे पाणी आले आहे. त्यामुळे हा रस्ता रहदारीसाठी बंद करण्यात आला आहे. या मार्गावरील उन्हेरे फाटा येथील पूल पाण्याखाली गेला आहे. येथे कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुधागड तालुक्यातील खुरावले फाटा येथील भेराव गावाकडे जाणाऱ्या अंतर्गत रोडवरील



पुलही पाण्याखाली गेल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

हवामान खात्याने रायगड जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे जनजीवन आणखी विस्कळीत होण्याची शक्यता आहे. खेड तालुक्यातील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. या नदीचे पाणी आता शहरातील मटण मार्केटमध्ये येण्यास सुरूवात झाली आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर स्थिती बिघडून हे पाणी मुख्य मार्केटमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. स्थानिक प्रशासन या प्रकरणी परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे. खेड नगरपरिषदेने नागरिकांना सतर्कतेची सूचना दिली आहे.

मुसळधार पावसामुळे जगबुडीच नव्हे तर नारंगी नदीलाही पूर आला आहे. यामुळे खेड शहरातील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेलेत. घाटमाथ्यावरील पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्यामुळे नागोठणे शहरातील रस्तेही जलमय झालेत. येथील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. पुढील काही तास असाच पाऊस सुरू राहिला तर येथील बहुतांश घरे पाण्याखाली जाण्याची भिती आहे. प्रशासनाने खबरदारी म्हणून बोटी रस्त्यावर उतरवल्या आहेत.

दुसरीकडे, हवामान खात्याने आज रायगड जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसेच पुढील काही तासांमध्ये पावसाचा जोर वाढण्याचाही इशारा दिला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने सर्वच शाळा व महाविद्यालयाना सुट्टी जाहीर केली आहे.

# डॉ. श्रीपाल सबनीस यांचा गौरव समारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १९ :**

महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा, पुणे आणि महाराष्ट्रातील साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ७५ संस्थांच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत आणि ८९ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांच्या गौरव समारंभाचे आयोजन रविवार दिनांक २२ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. यानिमित्त ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री पद्मविभूषण शरद पवार यांच्या हस्ते सबनीस यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

याप्रसंगी डॉ. श्रीपाल सबनीस लिखित 'विवेकाची पेरणी' आणि राजकारणाचा पंचनामा आणि सुनिताराजे पवार संपादित 'विवेकवादी डॉ. श्रीपाल सबनीस : विचार आणि वारसा' या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# विद्यार्थिनीची कॉलेजवरून उडी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**

एका 21 वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने कॉलेजच्या इमारतीवरून उडी मारून स्वतःची जीवनायात्रा संपवल्याची दुःखद घटना मुंबईत घडली घडली आहे. सकृतदर्शनी ही घटना आत्महत्येची असल्याचा दावा केला जात आहे. पण विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनी या प्रकरणी घातपाताचा संशय व्यक्त केला केला आहे. यामुळे ही हत्या की आत्महत्या याविषयी संभ्रमावस्था आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईच्या विलेपार्ले भागातील साठ्ये कॉलेजमध्ये गुरूवारी सकाळी ही घटना घडली आहे. संध्या पाठक असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. संध्या ही साठ्ये महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षात शिकत होती. आज सकाळी तिचा मृतदेह महाविद्यालयाच्या प्रांगणात इमारतीवरून पडल्याच्या स्थितीत आढळ्ला. त्यानंतरच एकच खळबळ माजली. महाविद्यालय प्रशासनाने संध्याच्या कुटुंबीयांना तिचा तिसऱ्या मजल्यावरून पडल्यामुळे मृत्यू झाल्याचे कळवले. पण हा आत्महत्येचा प्रकार असल्याची चर्चा साठ्ये कॉलेजमध्ये रंगली. सध्या विलेपार्ले पोलिस पुढील तपास करत



आहेत. पोलिसांनी या प्रकरणी महाविद्यालयाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले आहे. त्यात संध्या कॉलेजच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील कॉरिडोअरमधून चालत जाताना दिसून येत आहे. ती तेथून पडल्यानंतर तत्काळ तिला बाबासाहेब गावडे चॅरिटेबल ट्रस्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनी आपल्या मुलीने आत्महत्या केली नसून, कुणीतरी तिचा घातपात केल्याचा संशय व्यक्त केला आहे. आमच्या मुलीने आत्महत्या केली नाही. तिला कुणीतरी पाठीमागून ढकलले असावे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलिस सर्वच अंगानी या घटनेचा तपास करत आहेत.

# प्रयोगात्मक कलांच्या अभ्यासासाठी आता शाहीर साबळे संशोधन केंद्र : आशिष शेलार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९**

महाराष्ट्रातील पारंपरिक आणि प्रयोगशील कलांचा अभ्यास व संशोधनासाठी आता समर्पित केंद्र स्थापन होणार आहे. पु.ल. देशपांडे कला अकादमीत लवकरच 'शाहीर साबळे संशोधन केंद्र' सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे प्रयोगात्मक कलांचा दस्तऐवज तयार करणे, त्यांचे वर्गीकरण आणि सखोल विश्लेषण, या उद्देशाने हे केंद्र सुरू होणार असून, याचा उपयोग पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

या संशोधन केंद्राच्या स्थापनेसाठी आज मंत्रालयात सांस्कृतिक विभागाची उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. यामध्ये मंत्री शेलार यांनी केंद्राचा आराखडा त्वरीत तयार करण्याचे आदेश दिले. नाटक, लोककला, संगीत, नृत्य, कीर्तन, पोवाडा, तमाशा, वगनाट्य, दशावतार, भारूड या सर्व पारंपरिक व लोककला प्रकारांचा अभ्यास केंद्रात केला जाणार आहे.

केंद्राला शाहीर साबळे यांचे नाव देण्यामागची भूमिका स्पष्ट करताना मंत्री शेलार म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून ते तमाशा, पोवाडा, लोकगीतांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांचे कार्य अविस्मरणीय आहे. त्यांच्या नावाने संशोधन केंद्र उभारणे हा महाराष्ट्र संस्कृतीला अभिवादन आहे."



या बैठकीस सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे तसेच विभागातील अधिकारी उपस्थित होते.राज्यात अकृषी विद्यापीठांच्या माध्यमातूनही काही प्रयोगात्मक कलांवर कार्य सुरू आहे, त्यांच्यासह संलग्नता ठेवत एकात्म अभ्यासाची मांडणीही करण्यात येणार आहे.

मंत्री शेलार पुढे म्हणाले की, "प्रयोगात्मक कला म्हणजे महाराष्ट्राची ओळख आहे. त्यामागे लोकजीवन, इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन आहे. या कलांचं वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण, दस्तऐवजीकरण आणि जागतिक स्तरावर परिचय व्हावा, यासाठी हे संशोधन केंद्र क्रांतिकारी ठरणार आहे." या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील कलावंत, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी नव्या संधींचे दार खुले झाले.

# पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज डॉ. सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ. सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला.

सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ. सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ. सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला.

या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही. मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन ष्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ. सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली.

डॉ. सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ. डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ. सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ. सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ. सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ. सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

## नांदुरा पोलिसांची गोवंश तस्करीवर धडक कारवाई

# ५९ गोवंशाची निर्दयीपणे वाहतूक; चार आरोपी अटकेत!

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**– राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरून नांदुरा दिशेने येणाऱ्या तीन वाहनांमध्ये निर्दयतेने गोवंशाची तस्करी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर नांदुरा पोलिसांनी तातडीने सापळा रचून मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ५९ गोवंश जखमी अवस्थेत आढळून आले असून, चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.



गोसेवा समितीचे सदस्य उद्धव नेरकर यांनी मलकापूरकडून तीन आयशर ट्रकमधून गोवंशाची अमानुषपणे वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना दिली. माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापूर नाक्यावर नाकाबंदी करण्यात आली. पोलिसांनी तीन ट्रक थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये ४२ गायी आणि १७ वासरे (एकूण ५९ गोवंश) ही अत्यंत कमी जागेत, दोऱ्याने बांधून, अन्न-पाण्याशिवाय निर्दयीपणे कोंबून नेली जात असल्याचे स्पष्ट झाले.

जखमी आणि थकलेल्या गोवंशाला तत्काळ उपचार व निवाऱ्यासाठी महादेव गोरक्षण संस्था, आमसरी येथे हलविण्यात आले. या संपूर्ण प्रकरणात एकूण ३८ लाख ९१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात तीन ट्रक आणि ५९ गोवंशांचा समावेश आहे. फिर्यादी अनिल गोराने यांच्या तक्रारीवरून संबंधित चार आरोपींविरोधात प्राणी कल्याण कायदा कलम ११, मोटार वाहन अधिनियम कलम ६६ व १९२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक विलास पाटील, सपोनि जगदीश बांगर, पीएसआय इंगळे बाबा, एएसआय जवंजाळ, हेड कॉन्स्टेबल मुंजाळ, कैलास सुरडकर, अनिल गोराणे, पंकज डाबेरावं, रवी सावळे, शकील तडवी यांनी संयुक्तपणे पार पाडली.

## कुलरचा शॉक लागून चिमुकल्या गौरवचा मृत्यू

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** – येथून जवळच असलेल्या वडाळी येथील गौरव चेतन वक्टे या चार वर्षाच्या चिमुकल्यास घरामध्ये खेळत असताना कुलरचा शॉक लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना १८ जून रोजी संध्याकाळी सहा वाजता घडली.



सविस्तर वृत्त असे की वडाळी येथील चेतन नारायण वक्टे हे शेतामध्ये कामानिमित्त गेले होते. गौरवची आई घरकाम करत होती. यावेळी चिमुकला गौरव घरामध्ये खेळताना नकळत कुलर जवळ गेला असता कुलर मध्ये करंट आल्याने त्याला कुलरच्या करंटचा जबर धक्का लागून तो खेचला गेला. त्याला नांदुरा येथे शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्याच्यावर रात्री दहा वाजता वडाळी येथे अंतिम संस्कार करण्यात आले. नेहमी सर्वांच्या नजरेसमोर असणारा, कुणालाही दिसताक्षणी आपुलकीने ओढ लावणारा, सदा हसतमुख चिमुकला गौरव असा चटकन पाखरासारखा निघून गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## दर महिन्याला १० हजाराची खंडणी मागितल्याने

# दोघांवर खंडणीचा गुन्हा दाखल

**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** – महिन्याला आठ – दहा हजार रुपये दे अन्यथा सॉ मिल चालू देणार नाही. ब्लॅकमेलिंग द्वारे पैशाच्या मागणी करणाऱ्या विरोधात जळगाव जामोद पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. खंडणी मागितल्याची तक्रार १९ जुन रोजी जळगाव जामोद शहरातील आरा मशीन मालकांनी एकत्रित येऊन दिली आहे.



लाकूड कटाई चे काम करणारे जळगाव जामोद शहरातील निंभोरा रोडवरील आझाद सॉं मिल येथे आरा मशीन मालक इमरान शफाकत अली खान काम करीत असताना शेख सईद शेख कदिर यांचेसह सय्यद युसुफ सय्यद मुसा यांनी येऊन दर महिन्याला आठ ते दहा हजार रुपये महिना दे, मागील तीन दिवसापासून मी तुला बोलत आहे समजत नाही का, धंदा करना है तो मुझे दस हजार रुपये महिना दो, असे म्हणून खंडणीची मागणी केली. त्यावर फिर्यादी इम्रान शफाकत अली खान यांनी म्हटले माझ्याजवळ पैसे नाही आहेत त्यावेळी शेख सईद शेख कदीर व सय्यद युसुफ या दोघांनी शिवीगाळ करून तुमच्या विरुद्ध एखाद्या बाईला उभे करून खोटी तक्रार द्यायला लावेल व खोट्या केसेस करून तुम्हाला अडकविल अशी धमकी दिल्याने जळगाव जामोद शहरातील मोहम्मद सलीम मोहम्मद शरीफ (भारत सॉ मिल), शेख मोहम्मद शेख अब्बाज (बिसमील्ला सॉ मिल), बाबर खान अमानउल्ला खान (नेक नाम सॉ मिल), रामनिवास मनोहरलाल यादव (खातु सॉ मिल), आनंदकुमार गिरझारीलाल शर्मा (श्री लक्ष्मीनारायण सॉ मिल) असे यांचे सह सर्व मशीन मालकांनी एकत्रित येऊन जळगाव जामोद पोलीस स्टेशनला शेख सईद शेख कदीर व त्याचा सहकारी सय्यद युसुफ सय्यद मुसा यांच्या विरोधात खंडणी मागितल्याची तक्रार दिल्याने दोघांवरही खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात पीएसआय नारायण सरकटे करीत आहेत.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 'माय भारत' व 'योगसंगम' पोर्टलवर नोंदणी करा – मुख्याधिकारी अरूण मोकळ

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)**: २१ जुन २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. योग हा आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. शारीरिक, मानसिक आणि आत्मिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व अनमोल आहे. नियमित योग केल्याने आरोग्य टिकून राहते, ताणतणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये योगाबाबत जनजागृती व्हावी हा उद्देश असून त्यानुसार कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे.




आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ च्या निमित्ताने, सर्व नागरिकांना आणि संस्थांना 'माय भारत' (My Bharat Portal) आणि 'योगसंगम' (Yogsangam Portal) या पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या नोंदणीमुळे योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांना व्यापक स्वरूप मिळेल आणि जास्तीत जास्त नागरिकांना यात सहभागी होता येईल.

**'माय भारत' पोर्टलवर वैयक्तिक नोंदणी** :- प्रत्येक नागरिकाला, विशेषतः तरुणांना, 'माय भारत' पोर्टलवर (https://mybharat.gov.in/) स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या पोर्टलवर नोंदणी करून नागरिक आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे भाग घेऊ शकतात. योग दिनाचे महत्त्व, योगाचे फायदे आणि सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची आहे.

'योगसंगम' पोर्टलवर कार्यक्रम स्थळांची नोंदणी : विविध संस्था, योग केंद्रे, शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक संस्थांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याच्या ठिकाणांची नोंदणी 'योगसंगम' पोर्टलवर (https://yogsangam.nic.in/) करावी.

या पोर्टलवर कार्यक्रम स्थळांची नोंदणी केल्याने देशभरातील योग दिनाच्या कार्यक्रमांचे एकत्रीकरण करणे शक्य होईल. यामुळे लोकांना त्यांच्या जवळच्या योग कार्यक्रमांची माहिती मिळण्यास मदत होईल आणि योग दिनाचे आयोजन अधिक प्रभावी होईल. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग तसेच योगाचे महत्त्व आणि फायदे लोकांपर्यंत पोहोचवणे आणि राष्ट्रीय स्तरावर योग दिनाच्या कार्यक्रमांची माहिती उपलब्ध करणे तसेच जास्तीत जास्त नागरिकांना योगाशी जोडले जाण्यासाठी प्रोत्साहित करता येईल.

आपण खालील क्यूआर कोड (QR CODE) स्कॅन करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून सर्वांनी या मोहिमेत सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ यशस्वी करावा, असे आवाहन डॉ. किरण पाटील, (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बुलढाणा मुख्याधिकारी नगर परिषद देऊळगाव राजा अरुण मोकळ यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**: खामगाव रोडवरील हॉटेल शिवगुरु समोर एका भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीस्वाराला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना १८ जुन २०२५च्या रात्री १०.१५वाजेदरम्यान घडली. याबाबत प्राप्त माहितीनुसार खामगाव येथील सतीश श्रीकृष्ण मुरंकार वय ३७ वर्षे हे आपल्या दुचाकी क्रं एम एच -३० बीपी-८१६०ने जात असताना रात्री १०.१५ वाजेदरम्यान हॉटेल शिवगुरु समोर एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली. अपघाताचे वृत्त समजताच नांदुरा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या १०८रुग्णवाहिकेचे डॉ शेख ,चालक गणेश वनारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत अपघातातील जखमीला उपचारासाठी खामगाव येथील शासकीय रुग्णालयात हलविले मात्र त्यांची प्रकृती अत्यवस्थ असल्याने त्यांना पुढील उपचारार्थ अकोला येथे हलविण्यात आले आहे.

## जुन्या वादातून बेदम मारहाण; युवकाचा मृत्यू!

**खामगाव (का.प्र.)**: शेगाव तालुक्यातील जलंब येथे जुन्या वादातून झालेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. योगेश प्रल्हाद मोहे (वय ३२) असे मृत युवकाचे नाव असून, त्यांच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ही घटना १४ जून रोजी घडली. मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर आरोपी वासुदेव धोडुजी मोहे, गजानन धोडुजी मोहे, शालीग्राम धोडुजी मोहे आणि विशाल शालीग्राम मोहे (सर्व रा. जलंब) यांनी मिळून योगेश मोहे यांना गावातील संतोष काळे यांच्या घराजवळ पकडले आणि लोखंडी पाईपने बेदम मारहाण केली. या मारहाणीत योगेश गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अकोला व त्यानंतर नागपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. उपचार सुरु असतानाच १८ जून रोजी दुपारी पावणेचार वाजेच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी योगेश मोहे यांची पत्नी पल्लवी योगेश मोहे यांनी शेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेनंतर पोलीसांनी तातडीने कारवाई करत गुरुवारी रात्रीच तिन्ही आरोपींना जलंब येथून अटक करण्यात आली आहे. या घटनेने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## क्रीडा संकुलातील ४०० मीटर ट्रॅक कायम ठेवुन योग्य देखभाल व दुरुस्ती करण्याची मागणी



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**– तालुका क्रिडा संकुलातील ४०० मीटर ट्रॅक कायम ठेवुन ट्रॅकची योग्य देखभाल व दुरुस्ती करावी अशी मागणी पोलीस भरतीसाठी सराव करणाऱ्या युवक व युवतींनी तहसीलदार , नांदुरा यांच्या कडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

सदर निवेदनात त्यांनी नमुद केले की, नांदुरा तालुका क्रिडा संकुलात पोलीस भरतीसाठी सराव करणारे अनेक विद्यार्थी गरीब व शेतकरी कुटुंबातील आहेत. येणाऱ्या काही महिन्यात पोलीस भरती प्रक्रीया होणार आहे. या स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी नांदुरा तालुक्यातील सुमारे २०० हुन अधिक मुले, मुली दररोज क्रिडा संकुलात सरावासाठी येतात. परंतु काही दिवसांपुर्वी क्रिडा संकुल बंद करण्यात आले असुन त्या ठीकाणी केवळ २०० मीटरचा ट्रॅक बनविण्याची योजना असल्याचे सांगण्यात आले आहे. तरी क्रिडा संकुलातील ४०० मीटरचा ट्रॅक पुर्ववत ठेवावा, त्याची योग्य दुरुस्ती व देखभाल करण्यात यावी, व्यवस्थापन व देखरेखीसाठी संकुलात कायमस्वरुपी कर्मचारी नेमावा व विद्यार्थ्यांना संकुल सतत उपलब्ध रहावे जेणे करुन या माध्यमातुन अनेक गरीब व ग्रामीण भागातील तरुण तरुणींना पोलीस भरतीसाठी योग्य सुवीधा मीळतील व त्यांनी यश मीळवले तर आपल्या नांदुरा तालुक्याचा अभिमान वाढेल असे सदर निवेदनात नमुद करण्यात आले आहे. निवेदनावर ६० युवक युवतींच्या स्वाक्षऱ्या आहेत .

## मालवाहू वाहनाच्या धडकेत सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू

**खामगाव** – भरधाव वेगातील मालवाह वाहनाने दुचाकीला जबर धडक दिल्याने दुचाकीस्वार सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी वसंतराव बाजीराव काळे रा. शेगाव नाका, खामगाव यांचा मृत्यू झाल्याची घटना काल सायंकाळ दरम्यान शेगाव रोडवरील महिंद्रा शोरुमनजीक घडली. वसंतराव काळे हे सायंकाळी दुचाकीने घरी जात होते. दरम्यान उपरोक्त ठिकाणी भरधाव वेगात जाणाऱ्या टाटा मेगा मालवाहू क्र. एमएच २८ बीबी१५५६ ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात वसंतराव काळे यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर आज सकाळी ओंकारेश्वर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे. या प्रकरणी वाहन चालक अमोल दशरथ तायडे (३२) रा. मडाखेड बु. ता. जळगाव जामोद याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बालमृत्यू कमी करण्यासाठी जिल्ह्यात 'स्टॉप डायरिया' अभियानाला सुरुवात



**बुलडाणा (जिमाका)** – जिल्ह्यात पाच वर्षांखालील बालकांमध्ये अतिसारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी १६ जून ते ३१ जुलै २०२५ दरम्यान 'स्टॉप डायरिया' अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ स्थानिक नागरी आरोग्य केंद्र, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला.

उद्घाटन सोहळ्याला जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जवरे, डॉ. सपना मोरे, डॉ. शाकीर यांची उपस्थिती होती.

यावेळी आशा स्वयंसेविकांनी (ओरल रिहायड्रेशन सॉल्यूशन) चे प्रात्यक्षिक करून अतिसारामुळे शरीरातील होणाऱ्या जलशुष्कतेपासून बचाव कसा करता येतो, हे प्रत्यक्ष दाखवले. कार्यक्रमास दीपक महाले, गणेश परिहार , पूजा जाधव, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका व अन्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील गाव व शहरी भागातील अंगणवाड्या, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्रे व शासकीय संस्था यामधील ० ते ५ वयोगटातील बालकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. अतिसाराची लक्षणे आढळणाऱ्या बालकांना व झिंक सप्लीमेंट तात्काळ दिले जाणार आहे.

अभियानासाठी आवश्यक असलेले आणि झिंक पावडरचे साहित्य सर्व अंगणवाडी केंद्रे व आरोग्य संस्थांमध्ये आधीच वितरित करण्यात आले आहे. यासोबतच स्तनपान प्रोत्साहन, रोटा व्हायरस लसीकरण, हातांची स्वच्छता, सुरक्षित पाण्याची उपलब्धता यासारख्या आरोग्यविषयक बाबतीत मार्गदर्शन दिले जाणार आहे.

## इंदिरा गांधी निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांनी एनएसएपी पोर्टलवर आधार व्हेरिफिकेशन करा-जिल्हाधिकारी

**बुलडाणा (जिमाका)** – केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दपकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी दिव्यांग निवृत्तीवेतन योजना यांच्यांतर्गत एकूण ५२ हजार ३६५ लाभार्थी केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणीकृत आहेत.

परंतु त्यापैकी ५ हजार १३७ लाभार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन प्रलंबित असल्याने योजनेचा लाभपासून वंचित राहू शकतात. त्यामुळे लाभार्थ्यांनी पोर्टलवर तातडीने आधार व्हेरिफिकेशन करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या अनुदानाचा हिस्सा (₹२००/₹३००/₹५००)पोर्टलमार्फत तर राज्य शासनाचा हिस्सा (₹१३०० /₹१२०० /₹११००) तहसील कार्यालयामार्फत प्रणालीने खात्यात जमा करण्यात येत होता. परंतु, जानेवारी २०२५ पासून राज्य शासनाच्या विशेष सहाय्य विभागाच्या नव्या धोरणानुसार अनुदानाचा राज्य हिस्सा थेट लाभार्थ्यांच्या खात्यात डिबीटी प्रणालीद्वारे जमा केला जात आहे. त्यामुळे, लाभार्थ्यांचे आधार पोर्टलवर व्हेरिफाय होणे अत्यावश्यक आहे. यासाठी आधारमध्ये अद्ययावत माहिती आणि मोबाईल क्रमांक लिंक असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील ५ हजार १३७ लाभार्थ्यांचे आधार व्हेरिफिकेशन प्रलंबित आहे. त्यामुळे, लाभ बंद होण्यापूर्वी त्वरीत आधार व्हेरिफिकेशन करुन घ्यावी. तसेच आपले नाव यादी असल्याची खात्री करावी. आपले नाव यादीत असल्यास आधार कार्ड अद्ययावत करावे, मोबाईल नंबर लिंक करावा, संबंधित तहसील कार्यालयात आधार सादर करून पोर्टलवर व्हेरिफिकेशन करून घ्यावे. आधार व्हेरिफिकेशन न केल्यास आपला लाभ थांबविण्यात येऊ शकतो. अशा परिस्थितीत संपूर्ण जबाबदारी संबंधित लाभार्थ्याची राहील, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.


## नगर पंचायत कार्यालय, संग्रामपूर जि. बुलढाणा

### आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५

जा.क्र. २५१/२०२५ दि. १९/०६/२०२५

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ साजरा करणे आणि 'माय भारत' आणि 'योगसंगम' पोर्टलवर नोंदणी करणेबाबत दिनांक २१ जुन २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ च्या (International Yoga Day 2025) निमित्ताने, सर्व नागरिकांना आणि संस्थांना 'माय भारत' (My Bharat Portal) आणि 'योगसंगम' (Yogsangam Portal) या पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या नोंदणीमुळे योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांना व्यापक स्वरूप मिळेल आणि जास्तीत जास्त नागरिकांना यात सहभागी होता येईल.

'माय भारत' पोर्टलवर वैयक्तिक नोंदणी प्रत्येक नागरिकाला विशेषतः तरुणांना 'माय भारत' पोर्टलवर(https://mybharat.gov.in/) स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या पोर्टलवर नोंदणी करून नागरिक आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे भाग घेऊ शकतात.

'योगसंगम' पोर्टलवर कार्यक्रम स्थळांची नोंदणी विविध संस्था, योग केंद्रे, शाळा, महाविद्यालये आणि स्थानिक संस्थांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याच्या ठिकाणांची नोंदणी 'योगसंगम' पोर्टलवर (https://yogsangam.nic.in/) करावी. या पोर्टलवर कार्यक्रम स्थळांची नोंदणी केल्याने देशभरातील योग दिनाच्या कार्यक्रमांचे एकत्रीकरण करणे शक्य होईल. यामुळे लोकांना त्यांच्या जवळच्या योग कार्यक्रमांची माहिती होईल आणि योग दिना निमित्त महत्त्व आणि फायदे लोकांपर्यंत पोहचविणे शक्य येईल.

संग्रामपूर शहरा मध्ये जि.प. हायस्कूल प्रांगणा मध्ये दिनांक २१ जून सकाळी ६.१५ वाजता आंतरराष्ट्रीय योग दिन आयोजित करण्यात आला आहे. आपण खालील क्यूआर कोड (QR CODE) स्कॅन करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून सर्वांनी या मोहिमेत सहभागी होऊन आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ यशस्वी करावा, असे आवाहन मा. नगराध्यक्षा व मुख्याधिकारी नगर पंचायत संग्रामपूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

Yogsangam Portal

My Bharat Portal

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर पंचायत संग्रामपूर

'देवा शपथ खरं बोलेल, खोटे बोलणार नाही' असे वाक्य न्यायालयात आपण नेहमी ऐकतो. अगदी त्याच पद्धतीने 'मी निष्पाप, निष्ठेने काम करेन, तुमचा आदेश तंतोतंत पाळेन', असा शब्द भारतीय जनता पक्षात प्रचंड विरोधानंतरही प्रवेश 'सुखकर' झालेल्या नाशिक येथील एकेकाळचे शिवसेनेचे (ठाकरे गट) खंदे नेते व माजी नगरसेवक सुधाकर (पंत) बडगुजरांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना दिल्याचे ऐकले. अगदी चार सहा महिन्यापूर्वी विधानसभेच्या पवित्र सभागृहापासून तर ज्यांच्याकडे विरोधकांचे पूर्ण चारित्र्यहनन करण्याची जबाबदारी दिली आहे, असे नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांनी ज्या बडगुजर यांना 'देशद्रोही' म्हणून हिणवले होते, त्यांनीच या 'देशभक्त' नेत्यास रेड कार्पेट अंथरून त्यांचे स्वागत केले. काळाचा महिमा किती अगाध असतो हे महाराष्ट्रातील जनतेने न्याहाळले. नंबर एकचा पक्ष बनविण्यासाठी नंबर दोनच्या लोकांची काय गरज आहे ? असा प्रश्न आता यापुढे कोणी विचारू नये. यावरून एक लक्षात येते की, उद्या दाऊद ईब्राहीम, टायगर मेमन, याकुब मेमन, इकबाल मिर्ची, छोटा शकील, अबू सालेम, मुस्तफा डोसा, सलीम कुत्ता यातील अनेकांना कालपर्यंत 'देशद्रोही' म्हणून गणले गेले असले, तरी त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करायचा निर्णय घेतलाच, तर कदाचित यातील अनेकांना पक्षात घेऊन बडगुजर यांना जो न्याय दिला, तोच न्याय दिला जाईल असे वाटते. कारण सुधाकर बडगुजर जेव्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत होते, तेव्हा भाजपने त्यांच्यावर देशद्रोहाचे आरोप केले होते. विरोधकांना बदनाम करण्याची भाजपच्या नेत्यांवर मोठी जबाबदारी आली होती. शिवसेनेच्या नेत्यांना जेवढे बदनाम करता येईल तेवढे करा, त्यांचे संपूर्ण हाल झाल्यानंतर त्यांना पक्षात घ्या आणि शांत बसवा, ही भूमिका भाजपने यशस्वी करून दाखविली. आज बडगुजर आणि कंपनीला पक्षात प्रवेश देऊन स्वागत केलं जात आहे. मतभेद असले की 'देशद्रोही' आणि पक्षात आले की 'देशभक्त' हा प्रकार जनतेला कितीही हास्यास्पद वाटत असला तरी 'पार्टी विथ डिफरंट' असे म्हणणाऱ्या भाजपला त्यात काहीही गैर वाटत नाही. ही नितीमत्तेची नव्हे, तर सत्तेसाठीच्या सोयीची व्याख्या झाली आहे. लोकशाहीमध्ये विरोध सहन न झाल्यावर अशा दुटप्पी वागणुकीने लोकांचा विश्वास डळमळीत होतो. सत्तेसाठी देशद्रोहाचं लेबल लावणं आणि काढणं इतकं सोपं झालंय का? तर होय, खरंच खूपच सोपं झालंय. कारण भाजपमध्ये माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना आदर्श घोटाळ्यातून बेजार करणाऱ्यांनी पक्षात घेऊन त्यांना खासदार, तर त्यांच्या कन्येला आमदार करून दाखविले. एवढं केल्यावर त्यांचा आवाज थोडा वाढणार आहे. अशी गर्दी करून मांडलिकत्व स्वीकारणाऱ्या अनेक काँग्रेसच्या व विरोधकांच्या नेत्यांना पक्षात आणून थप्पी ला बसविण्याचा प्रयोग भाजपने कमालीचा यशस्वी करून दाखविला आहे. अर्थात असे असले तरी कुणाला सत्तेची मलई द्यायची, याचे देखील काही निकष ठरलेले आहेत. त्यामुळे विरोधकांना धक्का देऊन महायुतीमध्ये आलेल्या अनेकांना मानाचे ताट देण्याचा देखील प्रयोग भाजपने केला आहे. त्यामध्ये एकनाथ शिंदे असतील किंवा अजितदादा पवार असतील, आज ते सत्तेची मलई चाखतच आहे.





# नंबर एक'च पक्ष होण्यासाठी 'नंबर दोन'ची गरज?

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतून निलंबित करण्यात आलेले नाशकातील नेते सुधाकर बडगुजर यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

मात्र, त्यांच्या प्रवेशापूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वक्तव्याने सर्वांच्या भूवया उंचावल्या होत्या. कारण चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाबद्दल काहीही माहिती नसल्याचं नमूद केलं होतं. मात्र, दुपारी बडगुजर यांच्या पक्षप्रवेशावेळी खुद्द चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित असल्याचे पाहायला मिळाले अन् बडगुजरांनाही हायसे वाटले असेल.

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशासाठी मंत्री गिरीश महाजन यांनी मध्यस्थी केली व महाजनांनी त्यांच्या जीवनातही 'संकटमोचका'ची भूमिका घेतली. बडगुजर यांच्यासह माजी मंत्री बबनराव घोलप, माजी महापौर नयना घोलप, दुसरे माजी महापौर अशोक मुर्तडक यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

स्वतः पंचवीस ते तीस वर्षे आमदार, मुलगाही आमदार, मुलगी महापौर अशी पदे मिळालेल्या बबनराव घोलप यांच्यावर नेमका काय अन्याय झाला हे फक्त त्यांनाच माहिती . परंतु बडगुजर यांचा अपमान झाला हे त्यांना सहन झाले नाही, म्हणून त्यांनी पक्ष सोडला हे ऐकून अनेकांनी कपाळाला हात लावला असेल.

मनसेने मूर्तडकांना महापौर केले अजून त्यांना काय हवे होते ते कुणालाही समजले नाही. परंतु या दोघांच्याही पक्षप्रवेशाला विशेष महत्त्व आले नाही एवढे महत्त्व बडगुजरंच्या पक्षप्रवेशाला आले.

भारतीय जनता पक्षात प्रवेश करताना सुधाकर बडगुजर म्हणाले, आज माझा भाजपात प्रवेश झाला. तो प्रवेश आदराने झाला असा त्यांनी दावा केल्यावर सर्वांनाच आ. सीमाताई हिरे यांनी केलेला तयार डोळ्यासमोर आला असेल.

गिरीशभाऊ संकटमोचक आहेत. आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला, असे बडगुजर म्हणतात. महाराष्ट्रात सांडपाण्यातून वीज निर्मिती प्रकल्प दिला, तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत. या वाक्यातून त्यांच्यातील ठेकेदार वेळेवर जागा झाला.

बडगुजर यांचा प्रवेश झाला की करून आणला हा अभ्यासाचा विषय ठरू शकतो. संजय राऊत आणि बडगुजर यांचे सख्य उभ्या महाराष्ट्राला माहित आहे. बडगुजरांचा व्यवसाय तर मोठा आहे



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

व त्यांच्या कथित भागीदारांची बरीच चर्चा होत असते. त्यातच आता तर पुढे कुंभमेळा येतोय. पक्षाचं काय पुढे बघता येईल, पण व्यवसायाचं काय ? त्याला सुरक्षित असे एकच उत्तर भारतीय जनता पक्ष होय.

ठाकरेंकडून हकालपट्टी झाली अन बडगुजर यांचे घोडे गंगेत न्हाले. बडगुजर आणि बबनराव घोलप यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष मजबूत होईल. अधिक ताकदीनं पुढे जाता येईल. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या संकल्पाला पूर्ण करण्याचा प्रयत्न होईल, कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यासाठी त्यांनी पक्षप्रवेश केला, या बावनकुळे यांच्या भाषणाने कार्यकर्ते मनापासून हसले असतील.

कारण त्यांचे भाषण म्हणजे पूर्ण विनोदाने भरलेले वाटत होते. नितेश राणे यांच्या मागणीनुसार व मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने दाऊद इब्राहिमचा सहकारी सुलीम कुत्ता याच्यासमवेत मेजवानी करणाऱ्या सुधाकर बडगुजर यांना अखेर भाजपारुपी जगातील सर्वात पवित्र जेलमध्ये डांबण्यात यश आले.

आपल्याच पक्षाच्या एका आमदार व कॅबिनेट मंत्र्याची म्हणजेच नितेश राणे यांच्या मागणीची अगदी तातडीने दखल घेतल्याबद्दल संकटमोचकांस धन्यवाद दिलेच पाहीजे.

नारायण राणेंना भरल्या ताटावरून उठवल्याचा अपमान नितेश राणेंना विसरावाच लागला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे मकाऊ येथे कुटूंबासोबत गेले असताना त्यांचे कसिनो खेळतानाचे फोटो खासदार संजय राऊत यांनी ट्विट केले होते. त्यामुळे चांगलीच खळबळ उडाली होती आणि आरोपांच्या फैरी देखील झाडल्या होत्या.

बडगुजर यांच्या माध्यमातूनच संजय राऊत यांच्यापर्यंत फोटो पोहोचवले असे आरोप त्यावेळी करण्यात आले होते. बडगुजर यांचा भाजप प्रवेशाची चर्चा सुरू असतानाच आमदार सीना हिरे यांनीही हाच मुद्दा उपस्थित केला होता. पण आता पक्षाने बदनामीच्या सर्व 'सीमा' ओलांडून नवा इतिहास निर्माण करायचे ठरविलेच असेल, तर कार्यकर्ते व नेते तरी काय करणार?

■ ■ ■

## भाजपात प्रवेश करताच 'सुधाकर' झाले 'सुधारक'

मी निष्पाप, निष्ठेने काम करेन, तुमचा आदेश तंतोतंत पाळेन, तुम्ही सांगाल ते सर्व काही निमूटपणे ऐकेल. असा सुधाकर बडगुजरांनी बावनकुळेंना शब्द दिल्याची चर्चा संपूर्ण नाशिक जिल्ह्यात होत आहे. विशेष म्हणजे सुधाकर बडगुजर म्हणाले की, आज माझा भाजपात प्रवेश झाला, आदराने ( ?) प्रवेश झाला. त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीशभाऊ 'संकटमोचक' आहेत, आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. शिवसेना ठाकरे गटातून हकालपट्टी गेल्यानंतर नाशिकमधील शिवसेना नेते सुधाकर बडगुजर यांनी अखेर भाजपात प्रवेश केला. गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये सुधाकर बडगुजर व त्यांच्या समर्थकांच्या पक्षप्रवेशाने नाराजीचा सूर पाहायला मिळत होता. तर, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचे मकाऊतील कसिनो बारमधील फोटो बडगुजर यांनीच खासदार संजय राऊतांना पुरवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात झाला होता. त्यामुळे, या पक्षप्रवेशाला चंद्रशेखर बावनकुळे हजर राहतील का नाही असा प्रश्न होता. अखेर, मंत्री गिरीश महाजन यांनी एक 'कॉल' केला अन् प्रॉब्लेम 'सॉल्व्ह' झाला. प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत बडगुजर यांना भाजप प्रवेश झाल्यानंतर, यापुढे चंद्रशेखर बावनकुळेंचा आदेश तंतोतंत पाळेन, निष्ठेने काम करेन, असे त्यांनी म्हटलं नसतं तरी त्यांना निष्ठा दाखवावीच लागेल, याची त्यांना जाणीव आहेच. आता यापुढील वाटचाल त्यांना गिरीश महाजन या संकटमोचकाच्या मार्गदर्शनाशिवाय करताच येणार नाही हे त्यांना लक्षात घ्यावे लागेल.

## 'मनभेद नव्हते, मतभेद होते'चा जावईशोध

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकसित राज्याचा संकल्प झालाय. आम्ही सर्व कोअर ग्रुपचे पदाधिकारी, त्यांच्यासोबत चर्चा केली, तेव्हा सर्वच पदाधिकारी बडगुजर आणि घोलप यांच्या पक्षप्रवेशाने पक्ष मजबूत होईल आणि अधिक ताकदीनं आम्हाला पुढे जाता येईल, असे म्हटले. विधानसभा निवडणुकीत दिलेल्या संकल्पाला पूर्ण करण्याचा प्रयत्न आम्ही करतोय. विकासासाठी भाजपात पक्षप्रवेश होत असतो, कुठलीही अपेक्षा न ठेवता त्यासाठी त्यांनी पक्षप्रवेश केला आहे. स्टेज बनवून आमची इच्छा पक्षप्रवेशाची इच्छा होती. मनभेद नाहीत, मतभेद आहेत ते दूर होईल याचा विश्वास आहे. त्या त्या पक्षात असतो तेव्हा तो वाढवण्यासाठी पुढे जात असतो, कधी शिंतोडे उडवतो. मात्र, आता जबाबदारी आहे की जुन्या नव्यांना घेऊन पुढे जायचं आहे, असेही यावेळी बावनकुळेंनी म्हटलं. तर आज माझा भाजपात प्रवेश झाला, आदराने प्रवेश झाला. त्यामुळे भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. गिरीशभाऊ संकटमोचक आहेत, आपत्ती आली की ते मार्ग काढतात आणि त्यांनी माझा मार्ग काढला. आपल्यापर्यंत पक्षापर्यंत काय माहिती दिली हे माहिती नाही. मात्र, मी निष्पाप आहे, असे सुधाकर बडगुजर यांनी भाजपचा गमछा गळ्यात घातल्यानंतर वक्तव्य केले. कोरोना काळात मी काम केलं, कोणी बाहेर येत नव्हतं. महाराष्ट्रात जो पहिला प्रकल्प सांडपाण्यातून वीज निर्मितीचा केला, तो मुख्यमंत्र्यांनी दिला होता, ते दूरदृष्टीचे नेते आहेत, असे म्हणत बडगुजर यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. गिरीशभाऊ, बावनकुळे, रविंद्र चव्हाण जे मार्गदर्शन करणार त्याचे आपण पालन करू, निष्ठेने काम करु आणि परिकाष्ठा करु असे बडगुजर सांगत असतांना 'हीच का ती शिवसेनेची मुलुखमैदानी तोफ' असा प्रश्न अनेकांना पडला असेल.

# जीवनात अनुभवावी एकतरी वारी!

अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे,

आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी।

संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात,

जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर!

पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. अशी थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर तीर्थक्षेत्र आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

पृथ्वीवरी तीर्थे असती अपार ।
परी पंढरीची सर । एकाही नाही ॥

असा दाखला संत नामदेव महाराज देतात, तर

न करी आळस । जाय पंढरीशी ।
अवघी सुखराशी । तेथे आहे ॥,

असे संत चोखामेळा यांनी म्हटले आहे.

काशीच्या पाच यात्रा, द्वारकेला तीन वेळा जाणे, या दोन्ही यात्रांनी जेवढे पुण्य मिळते, तेवढेच पुण्य एका पंढरपूरच्या वारीने मिळते. सर्व सुखाचे आगर आणि संत मंडळींचे माहेरघर असल्यानेच

अवघी दुमदुमली पंढरी।
भगव्या पताका खांद्यावरी।
तुळशी वृंदावन डोक्यावरी।
भाव भुकेल्यांची ही वारी।,
असे म्हटले जाते.

संत ज्ञानेश्वरांनी वारी या व्रताचा प्रारंभ केला. तेव्हापासून चालू असलेल्या वारीमुळे पंढरपुरातील श्री विठ्ठलाची मूर्ती जागृतावस्थेत आली आहे. वारकरी राम कृष्ण हरी। असे नामसंकीर्तन सतत करत पंढरीस जातात. कलियुगात ईश्वराची कृपा संपादन करणाऱ्या एका व्यक्तीपेक्षा सर्व मिळून जेव्हा कृपा संपादनाचा प्रयत्न करतात, तेव्हा ती समष्टी साधना होते. वारीमध्ये व्यष्टीसह समष्टी साधनाही होते आणि सर्व जिवांच्या उद्धारासाठी विठ्ठलाला पंढरपुरात भूतलावर यावेच लागते.

या तीर्थाचा महिमाच असा आहे. येथील भक्तांच्या तळमळीमुळे विठ्ठलाला पंढरपुरात यावेच लागते. पंढरपूरच्या वारीने आपल्या जीवनात भक्तीचा अखंड झरा पाझरू लागतो. भावभक्तीचे बीज प्रत्येकाच्या अंतर्मनात रुजवणारी ही वारी पृथ्वीच्या अंतापर्यंत अशीच चालू रहाणार आहे.

भक्तांच्या संकटसमयी धावून येण्यासाठी, आपल्या भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी विठ्ठल पंढरपुरात उभा आहे. देव भावाचा भुकेला आहे, याची प्रचीती घ्यायची असल्यास पंढरपूरला जावे. शिस्तीचे दर्शन हे पालख्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. प्रत्येक दिंडीची रचना ठरलेली आहे. प्रारंभी भगवे ध्वजधारी वारकरी, मग तुळशी-वृंदावन घेतलेल्या महिला, त्यामागे टाळकरी, नंतर विणेकरी अशीच सर्व दिंड्यांची रचना असते.

टाळ वाजवणाऱ्या वारकऱ्यांचा पदन्यासही लयबद्ध असतो. भले टाळकरी-वारकरी शेकडोंच्या संख्येने का असेना! वैयक्तिक जीवनातील अभिनिवेष बाजूला ठेवून ईश्वराच्या नामस्मरणात देहभान विसरायला लावणारा आध्यात्मिक सोहळा म्हणजे पंढरपूरची वारी! श्रीक्षेत्र आळंदी आणि देहू येथून निघणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अन् जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या म्हणजे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभव!

ऊन-पावसाची तमा न बाळगता भगवी पताका खांद्यावर घेऊन टाळ-मृदुंगाचा गजर करत चालणारे वारकरी म्हणजे भावभक्तीचेच प्रतीक! कोणाच्याही तोंडवळ्यावर चिंता नाही कि मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधांची अपेक्षा नाही. वारकऱ्यांना प्रतिदिन १० ते २० किलोमीटरचा टप्पा चालत पार करावा लागतो. सकाळी लवकर मार्गस्थ व्हावे लागते. अल्पाहार आणि महाप्रसादही वाटेतच घ्यावा लागतो. सायंकाळी विलंबाने मुक्कामाच्या ठिकाणी पोचल्यानंतर भजन-कीर्तन होऊन दिवसाची समाप्ती होते.

विठुमाऊली तू माऊली जगाची ।
माऊलीच मूर्ती विठ्ठलाची, विठ्ठला मायबापा ॥

असा वारकऱ्यांचा पंढरीच्या विठुरायाप्रती असलेला भाव जगात सुविख्यात आहे. विठ्ठल विठ्ठल, जय हरि विठ्ठल, असे विठ्ठलाला आळवत वारकरी प्रतिवर्षी वारीला जातात आणि परत आल्यावर स्वतःपुरतीच नव्हे, तर परिसरातही विठ्ठलाची उपासना करतात. एरव्ही आरामदायक चारचाकीतून प्रवास करून पंढरपूरला जाणे आणि वारीत सहभागी होऊन माउलीला भेटणे यातील भेद वारकरीच सांगू शकतात. या भेटीला कोणत्याही ऐहिक सुखाची सर नाही. हा आनंद जीवनात एकदा तरी घ्यावा. प्रत्येकाने आयुष्यात एक तरी वारी अनुभवावी.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### चुकीचा संदेश नको...

झी मराठी या दूरदर्शन वाहिनीवर सायंकाळी साडेसात वाजता पारू आणि रात्री आठ वाजता लक्ष्मी निवास या मालिका दाखवल्या जातात. वटपौर्णिमेच्या निमित्ताने या मालिकेतील अभिनेते वडाच्या झाडाची पूजा करताना आणि वडाला धागा गुंडाळत फेऱ्या मारताना दाखवले आहेत.

पारू या मालिकेमधील आदित्य या अभिनेत्याचे त्यांच्या घरी घरकाम करणाऱ्या पारू या मुलीवर प्रेम आहे. तिच्यावर विषप्रयोग झाल्यामुळे ती इस्पितळात उपचार घेत असते. तिचे प्राण वाचावेत म्हणून आदित्य एका महिलेकडून वडाचे पूजन कसे करायचे? हे जाणून घेतो आणि वटवृक्षाची पूजा करून वटवृक्षाला धागा गुंडाळत फेऱ्या मारताना दाखवला आहे.

तर लक्ष्मी निवास या मालिकेतील सिद्धीराज नावाचा अभिनेता तो प्रेम करत असलेल्या भावना दळवी या मुलीने त्याच्या प्रेमाचा स्वीकार करावा यासाठी वटवृक्षाची पूजा करतो असे दाखवले आहे. खरे तर वटपौर्णिमा हे व्रत सुवासिनी महिलांचे आहे. परंतु धर्मशिक्षणाच्या अभावी आणि पैसे कमावण्याच्या हेतूने मालिकेमधून पुरुष अभिनेते वटपौर्णिमा हा सण साजरा करताना दाखवले आहेत. यामुळे समाजामध्ये चुकीचा संदेश जात आहे. दूरदर्शन मालिकांमध्ये पुरुष वडाचे पूजन करताना पाहून समाजातील अन्य पुरुष अशी चुकीची कृती करू शकतात. जे धर्मामध्ये मान्यच नाही ते दाखवण्याचा अट्टहास मालिकांमधून केला जातो आणि समाज मनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. कारण जे समोर दिसते सत्य आहे अशी समाजाची देखील चुकीची धारणा होते. त्यामुळे मालिकांमधून जे शास्त्रसंमत नाही ते दाखवू नये असे वाटते.

■ संगिता भोसले

### सेल्फीच्या नादात हरवलेली संवेदनशीलता!

कर्णावतीहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला अपघात झाला. अपघातानंतर घटनास्थळावरील अनेक व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाले. वृत्तवाहिन्यांवर दाखवण्यात आलेली दृश्ये, इमारतीत घुसलेला विमानाचा पुढील भाग, अनेक ठिकाणी पडलेले विमानाचे भाग, प्रवाशांचे मृतदेह हे बघून मन हेलावून गेले.

या अतिशय दुःखद प्रसंगी अनेकांनी मदतीसाठी पुढाकार घेतल्याचे व्हिडिओही समोर आले. मात्र, काहींच्या असंवेदनशील वागणुकीचे दृश्य पाहून मन सुन्न झाले. एका व्हिडिओमध्ये विमान अपघातात मृत झालेल्या एका महिलेचे शीर पडलेल्या ठिकाणी अनेकांनी घोळका केलेला दिसत होता आणि त्या धडापासून वेगळ्या झालेल्या शिरासोबत ते ह्यसेल्फीह्ण घेत होते. ही कृती म्हणजे समाजातील विकृत मनोवृत्ती दर्शवते. दुर्घटनेच्या ठिकाणी अशा प्रकारे ह्यसेल्फीह्ण घेण्याचे प्रकार यापूर्वीदेखील घडलेले आहेत. असे का घडले, कारण समाजाची सात्त्विकता कमी होऊन तमोगुण म्हणजे दुष्प्रवृत्ती, स्वार्थभावना, संकुचित वृत्ती, प्रसिद्धीची लालसा वाढत आहे.

आज शालेय शिक्षणात नीतिमत्तेचे धडे दिले जातात, पण त्यांचा संबंध केवळ परीक्षेपुरताच असतो, असे दिसते. म्हणूनच केवळ नैतिक मूल्यांचे शिक्षण पुरेसे नाही, तर त्यासोबतच साधना आणि धर्माचरण शिकवण्याची नितांत आवश्यकता आहे. तेव्हाच इतरांच्या संवेदना, भावना जाणवतील आणि तेव्हाच

सर्वे भवन्तु सुखिनः,
सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु,
मा कश्चित् दुःखभाग्भवेत।

ही भावना समाजात निर्माण होईल.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा



## या आकाशाचं काय?

कधीकधी एक प्रश्न मन पोखरत राहतो गरीबांचा जीव इतका स्वस्त का असतो?

हा मुलगा केवळ १४-१५ वर्षांचा होता. त्याचं नाव आकाश. त्याची आई हॉस्पिटलबाहेर चहाची टपरी चालवत होती. आकाश तिथे डब्बा द्यायला आला होता आणि सावलीत थोडावेळ झोपी गेला. पण दुर्दैव! एअर इंडियाच्या विमानाचे एक अवशेष त्या रस्त्यावर कोसळले. आगीच्या ज्वाळा त्याच्यापर्यंत पोहोचल्या आणि आकाशने तिथेच शेवटचा श्वास घेतला. विशेष म्हणजे तो न विमानात होता, ना त्या होस्टेलमध्ये. तो रस्त्याच्या कडेला होता. त्याला वाचवायला धावलेली त्याची आई सुद्धा ५०% भाजली आहे आणि ती सध्या रुग्णालयात मृत्यूसोबत लढतेय.

आता प्रश्न असा पडतो.. या कुटुंबासाठी कोण पुढं येणार आहे? सरकार? टाटा? ते एक कोटी देणार का? ज्यावेळी एखाद्याला १ कोटी दिलं जातं, तेव्हा नाचत, टाळ्या वाजवत पोस्ट करणारे आता कुठे आहेत? कुठल्या चॅनेलवर आहे या आकाशची बातमी? नेत्यांचे सिनेमॅटिक शॉट्स दाखवले गेले, भगवद्गीता वाचण्याच्या बातम्या चर्चेत आल्या, पण आकाशसारख्या निर्दोष, गरीब बालकाच्या मृत्यूवर कोण बोलणार?

एका आईचा संसार एका सावलीत संपला. या देशात एक सामान्य गरीब माणूस जर रस्त्यावर शांतपणे डोळे मिटून झोपी गेला, तर त्याचं भविष्य आकाशातुन येणाऱ्या ज्वाळांवर अवलंबून असतं का? हा केवळ अपघात नव्हे, हा एक सामाजिक प्रश्न आहे. गरीबाच्या जीवाला किंमत आहे का? की तो फक्त आकड्यांमध्ये हरवून जातो? आकाशसाठी आवाज उठवूया. त्याच्या आईसाठी न्याय मागूया. तिच्या अश्रूंना वाचा देऊया.... ■ ■



# डायबिटीज रुग्णांसाठी फळ आणि फळांचा रस यापैकी काय आहे जास्त फायदेशीर?

डायबिटीज म्हणजेच मधुमेह असणाऱ्यांनी आपल्या आहारात कोणते अन्नपदार्थ घेणे योग्य आहे आणि कोणते टाळावेत, याचे भान ठेवणे फार गरजेचे असते. कारण चुकीची आहाराची निवड केवळ आरोग्यावरच नव्हे तर थेट रक्तातील साखरेच्या पातळीवरही परिणाम करू शकते. याच पार्श्वभूमीवर सध्या एक मोठा प्रश्न समोर येतो तो म्हणजे फळ खाणं अधिक योग्य की फळांचा रस पिणं?

साधारणतः फळे ही आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मानली जातात कारण त्यामध्ये नैसर्गिक साखर म्हणजेच फ्रुक्टोज, फायबर, विविध प्रकारची जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. फायबरमुळे पचनक्रिया संथ होते, ज्यामुळे साखर शरीरात हळूहळू शोषली जाते. त्यामुळे ब्लड शुगर झपाट्याने वाढत नाही. तसेच फळे खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते, जे ओव्हरईटिंगपासून रोखते.

**फळांचा रस का नाही योग्य?**

फळांचा रस काढताना त्यातील फायबरचा भाग म्हणजे गूदा आणि साल वेगळे केले जाते. त्यामुळे त्यात फायबर जवळपास शून्य होतो. अशा रसायनशून्य रसामध्ये साखरेची मात्रा खूप जास्त असते आणि ती शरीरात झपाट्याने शोषली जाते, जे ब्लड शुगर वाढवते.

शिवाय, एक गिलास रस बनवण्यासाठी २-३ फळांचा वापर केला जातो, त्यामुळे त्यातील कॅलरी इन्टेक जास्त होतो. ही सर्व कारणं मिळून डायबिटीज असणाऱ्या व्यक्तींसाठी रस हे चांगले पर्याय ठरत नाहीत.

**योग्य फळांची निवड महत्त्वाची**

सर्व फळे डायबिटिक व्यक्तींना फायदेशीर असतीलच असे नाही. ग्लायसेमिक इंडेक्स यावर आधारित फळांची निवड केली पाहिजे. कमी जीआय असलेली फळे म्हणजे, सफरचंद, नाशपती, संत्री, जामुन, कीवी, अमरूद ही फळे हळूहळू साखर रक्तात मिसळतात आणि शुगर नियंत्रणात राहते.

दुसरीकडे, आंबा, केळी, चीकू, द्राक्षे यांसारख्या फळांचा जीआय जास्त असल्यामुळे ती रक्तातील साखर लवकर वाढवू शकतात. म्हणूनच अशा फळांचे प्रमाण नियंत्रित ठेवावे.

साबुत फळ खाणे ही रसाच्या तुलनेत चांगली सवय असली तरी त्याचेही प्रमाण ठरवूनच घेतले पाहिजे. खूप जास्त फळे एकत्र खाल्ल्यास त्यातून मिळणारी साखर एकदम वाढू शकते. त्यामुळे आहारात फळे समाविष्ट करताना पोषणतज्ज्ञांचा सल्ला घेणे उत्तम ठरेल.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### व्यक्तिमत्व

वैचारीक दर्जानुसार
होत असते कृती
कृतीतूनच होते
व्यक्तिमत्वाची
निर्मिती ..

कृती सकारात्मक की
की नकारात्मक
यावर प्रतिबिंब
असतेअवलंबून
म्हणून निर्णय
घ्यावे जपून ..

महासागर

शुक्रवार दि. २० जून २०२५

# खामगाव

पान ६

(बुलडाणा)


## गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराबाबत सुतार समाजाची बैठक

**खामगाव** - बुलढाणा जिल्हा सुतार समाजाकडून विद्यार्थ्यांच्या सत्काराबाबत सुतार समाजाची बैठक समाजाचे जिल्हा अध्यक्ष अनंतराव राऊत चिखली यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीमध्ये खामगाव तालुका प्रमुख म्हणून रविंद्र मानेकर यांची सर्वानुमते निवड करून राऊत यांचे हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. तर आशिर्वाद म्हणून ह.भ.प. शांताराम महाराज पाळेकर यांनी मार्गदर्शन करून मानेकर यांना शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा चांगाला व यशस्वी व्हावा त्या अनुषंगाने सर्व समाजबांधवानी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मानेकर यांनी केले, या प्रसंगी समाधान जंजाळकर, गजानन जवरकर, मंगेश जंजाळकर, शंकर न्याहाटकर, कृष्णा नेहाटकर, अॅड. अविनाश बावस्कर, दिपक अकोटकर, प्रकाश वडत्सकर, विजय तराळे, राजेश खिरपुरकर व समाजबांधव उपस्थित होते.

# थोडक्यात

## पत्रकार मोहम्मद रफी यांच्या घरी वंचित नेते डॉ. प्रविण पाटील यांची सांत्वनपर भेट



**सोनाळा (महासागर प्रतिनिधी)** - येथील पत्रकार मोहम्मद रफी सर यांचे मातोश्री सैदुबी शेख दाऊद यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले होते. यानिमित्ताने रविवारी १५ जून रोजी रफी सर आणि कुटुंबियांची नामवंत सर्जन आणि वंचितचे नेते डॉ.प्रवीण पाटील साहेब यांनी भेट घेऊन सांत्वन केले व दु:खाद सहभागी झाले. यावेळी मौलवी ज़काउल्लाह खान, डॉ.समीर शेख, उमेश पाटील, इबाद सर, पिंटू गायकी आदी उपस्थित होते.

## संत निरंकारी सत्संग भवन येथे योगदिनाचे आयोजन

**शेगाव (महासागर प्रतिनिधी)** - संत निरंकारी मिशन मार्फत आंतर्राष्ट्रीय योग दिवसाचे औचित्य साधून अवसर शनिवार, २१ जून रोजी सकाळी ६ वाजता भारतवर्षातील १००० पेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळी 'योग दिवस' आयोजित केला जाणार आहे. मिशनच्या विविध शाखांमध्ये हे आयोजन स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली खुल्या प्रांगणात किंवा उद्यानांमध्ये करण्यात येईल, ज्यामध्ये निरंकारी भक्तगण, सेवादल स्वयंसेवक व स्थानिक नागरिक उत्साहाने भाग घेतील. स्थानिक स्तरावर संत निरंकारी सत्संग भवन शेगांव येथे योग दिवसाचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये नागरिकांनीही सहभागी होऊन याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संतोष शेगोकार संयोजक जिल्हा बुलडाणा निरंकारी मिशनच्या स्थानिक प्रबंधकांकडून करण्यात आले आहे.

## गो. से. महाविद्यालयात बीसीए अभ्यासक्रमासाठी सीईटी नोंदणी अर्ज करण्याची सुविधा

**खामगाव** - महाराष्ट्र शासन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष(सीईटी) महाराष्ट्र राज्य मुंबई मार्फत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी बीसीए या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता पुन्हा सीईटी परीक्षा घेण्यात येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी १२ ते २० जून २०२५ पर्यंत ऑनलाइन नोंदणी अर्ज भरणे सुरु झाले आहे. जे विद्यार्थी याआधी घेण्यात आलेल्या सामायिक परीक्षेपासून वंचित राहिले आहेत त्या विद्यार्थ्यांना १२ ते २० जून २०२५ या कालावधीत बी. सी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा महाराष्ट्र शासनाने उपलब्ध कऊश्न दिलेली आहे. मागील वर्षीपासून बी.सी.ए. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्याकरिता सामायिक परीक्षा बंधनकारक करण्यात आलेले आहे. याकरिता प्रथम ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणी अर्ज करण्यासाठी गो. से. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागात सकाळी ११ ते ५ या वेळेत मोफत सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तरी बी.सी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर व संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. अरविंद तायडे (९८२३५७७००६) यांनी केले आहे.

## निमगाव वायाळ तलाव मासेमारी ठेक्यासाठी निविदा आमंत्रित

**बुलडाणा (जिमाका)**- शासनाने सुधारीत तलाव, जलाशय धोरण जाहिर केलेले आहे. त्यानुसार सन २०२५-२६ वर्षाकरिता, बुलढाणा जिल्ह्यातील ५०० हेक्टर खालील सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ १० हेक्टर तलावाच्या निर्धारित कार्यक्षेत्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना शासन निर्णय, अटी व शर्तीनुसार तलाव मासेमारी ठेक्याने देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी तलाव ठेका घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह दि. २४ जून २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), बुलढाणा येथे सादर करावेत. सन २०२५-२६ करीता बुलढाणा जिल्ह्यातील १० हेक्टर क्षेत्रफळाचा निमगाव वायाळ तलाव मासेमारी ठेका दि. ३० जून २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. सदर तलावाच्या कार्यक्षेत्रातील योगेश मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. केशवशिवणी यांनी तलाव घेण्यास नकार दिल्यामुळे हा तलाव अन्य पात्र संस्थांना देण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण प्रस्ताव सादर करावेत. आवश्यक कागदपत्रे : विहीत नमुन्यातील तलाव ठेका मागणी अर्ज (नमुना-१), ठराव व अर्ज, नोंदणी नाहरकत प्रमाणपत्र, उपविधी व ९७ वी घटना दुरुस्तीची प्रत, कार्यरत असल्याचे प्रमाणपत्र, थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र, संचालक मंडळ यादी, मागील ३ वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, बँक स्टेटमेंट (३ वर्षांचे), नफा-तोटा पत्रक (३ वर्षांचे), मत्स्यबीज संचयन व उत्पादन अहवाल (५ वर्षांचा), इतर उपयुक्त दस्तऐवज (, विमा, ई-श्रम कार्ड इ.), ४ हजार ५०० रुपयांचा धनादेश, एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त सभासद नसल्याचे प्रमाणपत्र व अटी-शर्ती हमीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

## श्री जबलेश्वर संस्थान मध्ये श्री सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन व रुद्रपूजा



**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)** - गुरुदेव श्री श्री रविशंकरजी यांच्या कृपाशिर्वादाने आणि मार्गदर्शनातून नांदुरा येथे, श्री जबलेश्वर संस्थान, नांदुरा खुर्द येथे हजारो वर्षांपूर्वीच्याअतीप्राचीन श्री सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या मूळ पिंडीचे दर्शन व रुद्र पूजेचे आयोजन आर्ट ऑफ लिविंग परिवार नांदुरा च्या वतीने १७ जून रोजी सकाळी करण्यात आले.

या पवित्र प्रसंगी बंगलोर आश्रम येथील स्वामी सूर्यतेजजी आणि स्वामी पुण्यश्लोकजी यांच्या प्रमुख उपस्थितीत, वैदिक धर्म संस्थान पंडितजी व सत्संग टीम नांदुराच्यावतीने भक्तिभावाने वेदघोष आणि वाचस्पतीताई चंदेल यांच्या सुमधुर सुंदर भक्तिगीतांचे गायन करून वातावरण अधिक पवित्र केले. या अलौकिक दर्शन सोहळ्याने अनेक भाविकांच्या मनात कृतार्थतेची भावना निर्माण केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग नांदुरा परिवार, धन निरंकार सेवा समिती नांदुरा, व श्री जबलेश्वर संस्थान, नांदुरा खुर्द यांनी परिश्रम घेतले. माजी आमदार राजेश एकडे , भाजपा नेते सुधिर मुर्हेकर, ह.भ.प.रामभाऊ झांबरे, भाजप शहराध्यक्ष प्रमोद हिवाळे, जिल्हा सरचिटणीस ब्रम्हानंद चौधरी, अमोल डहाके , उबाठा गटाचे शहर प्रमुख लाला इंगळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या दुर्लभ दर्शनाचा लाभ घेतला.

## पॉलीटेक्निक प्रवेशासाठी मुदत २६ जूनपर्यंत वाढवली

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** - तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्याने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी दहावीनंतरच्या तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांना आता २० मे ते २६ जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येईल. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची स्कॅन प्रती अपलोड करून ती पडताळणीसाठी सादर करण्याचीही अंतिम मुदत यापुढे २६ जून २०२५ पर्यंत आहे. ही पडताळणी प्रक्रिया ऑनलाइन व प्रत्यक्ष अशा दोन्ही माध्यमातून करण्यात येणार आहे. या टप्प्यात अर्ज भरल्याची आणि कागदपत्र पडताळणीची नोंद पूर्ण करण्याची अंतिम तारीख देखील २६ जूनच आहे. विशेष म्हणजे, ही अंतिम मुदत आता वाढवण्यात आली. त्यानंतर पुढील टप्प्यात २८ जून ला तात्पुरती गुणवत्ता यादी संकेतस्थळावर जाहीर केली जाईल. २९ ते ३० जून विद्यार्थ्यांसाठी हरकती दाखल करण्याचा कालावधी असेल आणि २ जुलै ला अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

या पार्श्वभूमीवर, इच्छुक विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी या वाढीव मुदतीचा लाभ घ्यावा व लवकरात लवकर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी,

प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी ही सुवर्णसंधी स्वीकारावी व तांत्रिक शिक्षणाच्या प्रवासाला एक उज्वल व गुणात्मक सुरुवात द्यावी. याबाबत अधिक माहितीसाठी महाविद्यालयाचे प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे (मो. ८९८९२२९८९८) यांच्याशी संपर्क करावा.

## मत्स्यकास्तकार, शेतकरी, सहकारी संस्था यांनी मत्स्यबीजाची मागणी नोंदवावी

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा भारतीय प्रमुख कार्प जातीच्या अर्थात कटला, रोहू, मृगळ माशांचा पावसाळी प्रजनन हंगाम जूलै २०२५ पासून सुरु होत आहे. मत्स्यव्यवसाय विभागाचे मत्स्यबीज उत्पादन केंद्र, कोराडी, ता. मेहकर जि. बुलढाणा येथे १५ जुलैपासून सुरु करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मत्स्यकास्तकार, शेतकरी व सहकारी संस्थांनी मत्स्यबीजाची मागणी लेखीस्वरुपात नोंदवावी, असे आवाहन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय सु.ग. गावडे यांनी केले आहे.

सर्व मच्छिमारी सहकारी संस्था आणि मत्स्यकास्तकारांनी फक्त शासकीय मत्स्यबीज उत्पादन केंद्रातूनच बीज खरेदी करणे बंधनकारक आहे. बीज खरेदीची पावती जवळ ठेवणे आवश्यक असून, ती कोणत्याही शासकीय योजनेच्या लाभासाठी आवश्यक मानली जाणार आहे. बाहेरून, इतर जिल्हा किंवा राज्यातून, खाजगी मार्गाने बीज खरेदीसाठी जिल्हा कार्यालयाची पूर्व परवानगी अनिवार्य आहे. विनापरवानगी बीज खरेदी आढळून आल्यास शासन धोरणानुसार कारवाई केली जाईल. मत्स्यबीज संचयनाचे पंचनामे करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय शासकीय योजनांचा लाभ घेणे कठीण होऊ शकते. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी आपल्या शेततळ्यातील किंवा तलावातील संचयनासाठी लागणाऱ्या मत्स्यजिरेची मागणी लेखी स्वरुपात सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), प्रशासकीय इमारत, बस स्थानकासमोर, बुलढाणा येथे त्वरीत नोंदवावी. मत्स्य उत्पादन वाढीसाठी हे बीज संचयन अत्यंत उपयुक्त ठरणार असून, सर्वांनी यामध्ये सक्रिय सहभाग द्यावा, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागातर्फे करण्यात आले आहे.

## माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या बंगल्यातील फ्रिजचा भिषण स्फोट

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)** - राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते व माजी मंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांच्या बुलडाण्यातील चिखली रोडवरील भव्य बंगल्यात मंगळवार १८ जून रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास बंगल्यातील किचनमध्ये असलेल्या प्रीजच्या कॉम्प्रेसरचा अचानक भीषण स्फोट झाला.

त्यामुळे आगीचा भडका उडाला सुदैवाने मोठा अनर्थ टळला. दरम्यान संध्याकाळी झालेल्या या घटनेच्या वेळेस बंगल्यात फक्त वॉचमन उपस्थित होता. अन्य कोणीही नसल्यामुळे मोठा जीवितहानी टळली. स्फोट इतका जबरदस्त होता की काही क्षणांतच परिसरात धावपळ उडाली. आवाजामुळे नागरिकांची एकच गर्दी जमली. घटनेची माहिती मिळताच बुलडाणा नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. फ्रीजच्या कॉम्प्रेसरचा ब्लास्ट नेमका कशामुळे झाला, याचा तपास अद्याप सुरू आहे. मात्र या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून, उच्चभ्रू वस्तीत घडलेला हा स्फोट किती गंभीर ठरू शकला असता, याचा प्रत्यय नागरिकांना आला. डॉ.शिंगणे हे त्यावेळी बंगल्यात उपस्थित नव्हते, ही बाब नशीब समजली जात आहे. पोलिस आणि अग्निशमन विभागाने तत्काळ प्रतिसाद दिल्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. मात्र संपूर्ण परिसरात या घटनेची चर्चा सुरु आहे.

## शासकीय वसतिगृहाचा रस्ता ८ दिवसांत पूर्ण करा अन्यथा उपोषण

### सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष मोहित दामोधर यांचा इशारा



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह जळगाव जामोद येथील रस्त्याची अत्यंत दैनिय अवस्था झाली असुन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, विद्यार्थ्यांच्या सोबत संवाद साधला असतांना तिथं मोठ-मोठे साप विद्यार्थ्यांना दिसून आले.

२८ सप्टेंबर २०२४ ला वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलन बुलढाणा जिल्हा पदाधिकारी यांनी वस्तीगृहाला भेट देऊन तेथील अधीक्षक यांना रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सांगितले व २ डिसेंबर २०२४ रोजी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त, बुलढाणा यांना निवेदनाद्वारे विनंती सुद्धा केलेली आहे, तरीसुद्धा रस्ता हा अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे.

जळगाव जामोद येथील मुख्य रस्त्याला जोडला जाणारा वस्तीगृहाच्या रस्ता नवीन बांधून डांबरीकरण करुण देण्यात यावे तसेच रस्तावर हायमास्ट लाईट बसवण्यात यावेत या प्रमुख मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी , गटविकास अधिकारी,गट शिक्षणाधिकारी जळगाव जामोद यांना १९ जून रोजी निवेदन सादर केले आहे.

२८ जून २०२५ पर्यंत मागणी मान्य न झाल्यास वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलन बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आमरण उपोषण करण्याचा इशारा सम्यक विद्यार्थी आंदोलन जिल्हा अध्यक्ष मोहित दामोदर यांनी दिला आहे. यावेळी वंचितचे जेष्ठ नेते रामकृष्ण रजाने,वंचितचे ओबीसी नेते विजय पोहनकर व वंचित बहुजन आघाडी व सम्यक विद्यार्थी आंदोलन जळगाव जामोद तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अमडापूर पोलिसांची अचानक नाकेबंदी आरोपीसह ३ लाख २० हजार रोख जप्त

**चिखली (महासागर प्रतिनिधी)** - पोलीस स्टेशन अमडापुरचे ठाणेदार निखिल निर्मळ यांनी १८ जून रोजी अचानक नाकाबंदी करून हरणी फाटा येथे नाकाबंदी सुरू असताना एक संशयास्पद इसम मोटरसायकल ने जात असताना त्याला थांबवून विचारणा केली असता त्याने आपले नाव शेख रिजवान शेख उस्मान वय ४० वर्ष रा. शिरसगाव (कसबा)जि.अमरावती सांगितले व पोलिसांना संशय आल्यामुळे त्या इसमाची झाडाझडती घेतली असता त्याकडून पाठीवरील बॅग मधून रोख ३ लाख रुपये व त्यांच्या खिशातून नगदी २० हजार २१० रुपये असे एकूण ३,२०२१० रुपये व बजाज कंपनीची डिस्कव्हर मोटरसायकल अंदाजे किंमत ३२०००/- रूपये तसेच १७ जून रोजी मोटर सायकल खरेदीची चिट्टी असा मुद्देमाल संशयित इसमाच्या अंग झडतीत मिळून आला. सदर संशयित इसमा विषयी माहिती घेतली असता संशयित इसमाविरुद्ध राजापेठ पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे त्याने ट्रक मधून ३ लाख ५० हजार रूपये चोरी करण्याबाबत गुन्हा दाखल आहे अशी माहिती अमडापूर पोलिसांना मिळाली. सदर संशयित आरोपी व मुद्देमाल सहित राजापेठ पोलीस स्टेशन तपास अधिकारी यांना सुपूर्त केला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर



**सुलतानपूर (महासागर प्रतिनिधी)** - येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात १८ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजन करण्यात आले होते.

१८ जून रोजी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शासनाचे सर्व विभाग सहभागी होते. महाराष्ट्र शासनाच्या सर्व जनकल्यानाच्या योजनांची माहिती आणि अंमलबजावणी या ठिकाणी करण्यात आली.

या मध्ये अँग्री स्टॅक,महसूल विभाग, संजय गांधी निराधार योजना विभाग, पुरवठा विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग, पशु वैद्यकीय विभाग, बँक आणि इतर विभागांचे अधिकारी, कर्मचारी यांनी उपस्थित राहून नागरिकांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला.

तरी सुलतानपूर महसूल मंडळातील जास्तीत जास्त लाभार्थी या शिबिरात उपस्थित राहून शिबिराचा लाभ घेतला. यावेळी नायब तहसीलदार योगीश्री परळीकर , वैद्यकीय अधिकारी निखिल पिसे,मंडळ अधिकारी येऊल, ग्राम महसूल अधिकारी एस.पी.पनाड , सुलतानपूर ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी जी ,एन, कावरके तसेच महसूल विभागाचे अनेक कर्मचारी ऑपरेटर सहायक महसूल अधिकारी उपस्थित होते. या ठिकाणी अनेक योजनांच्या माहितीचा अनेक लोकांनी लाभ घेतला.

## शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिन वृक्षारोपण करून साजरा



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)** - हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ ला शिवतीर्थ,मुंबई या ठिकाणी शिवसेनेची स्थापना केली आज शिवसेनेचा मोठा वटवृक्ष झाला असून दिनांक १९ जुन रोजी शिवसेनाचा ५९ वा वर्धापन दिन सोहळा जळगांव जामोद तालुक्यातील विविध ठिकाणी शिवसैनिकांनी ५०० वेगवेगळ्या झाडांचे वृक्षारोपण करून मोठ्या उत्साहात शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.यावेळी जळगाव जामोद ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरात विविध वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख देविदास घोपे,तालुका प्रमुख संजय धुळे, शिवसेना शहरप्रमुख संजय भुजबळ,तालुका प्रसिद्धी प्रमुख बाळूभाऊ पाटील, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख माधुरीताई राणे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सविता ढगे पाटील, किसानसेना तालुकाप्रमुख गजाननबाप्पु देशमुख, उपशहर प्रमुख पंडित माटे, एकलव्य पाटील, राजेंद्रसिंह परिहार, समाधान पाटील, जयप्रकाश बाप्पू देशमुख निभोरा, विभाग प्रमुख अंबादास चौधरी, शाखाप्रमुख विलास दातीर, अंबादास धुर्डे, रामदास निमकर्डे, दिलीप हागे यांचे अनेकांची यावेळी उपस्थिती होती.

### जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर कोर्ट संग्रामपूर यांचे न्यायालय**

एम.जे.सी.नं. ६४/२०२५

ने.ता.२१/७/२०२५

अर्जदारा तर्फे अॅड एल.आर. सातव, संग्रामपुर

अर्जदार :-१) शिला मुकुंदा तायडे, वय अं. ५९ वर्षे, व्यवसाय गृहिणी २) रविंद्र मुकुंदा तायडे, वय अं. ४० वर्षे, व्यवसाय शेती ३) विजय मुकुंदा तायडे, वय अं. ३८ वर्षे, व्यवसाय शेती ४) अमोल मुकुंदा तायडे, वय अं. ३४ वर्षे, व्यवसाय शेती सर्व रा. रुधाना, ता. संग्रामपुर जि. बुलढाणा

विरूध्द - गैरअर्जदार - कोणीही नाही.

या जाहीर नोटीसव्दारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणातील मयत मुकुंदा श्रीराम तायडे, रा. रुधाना ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथील रहिवासी होते व ते दिनांक ११/११/२०२४ रोजी मौजे रुधाना ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथे मयत झाले असुन मयत मुकुंदा श्रीराम तायड यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ४ हे मुले आहेत. मयत मुकुंदा श्रीराम तायडे हे मयत झाल्यानंतर त्यांच्या मागे अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदार यांनी वि. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी वरिल अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जा संबधात ज्या कोणास काही हरकत घेणे असेल, त्यांनी चौकशी तारीख २१/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. पावेतो या न्यायालयात अथवा स्वत: अथवा वकिलामार्फत हजर होऊन त्याची हरकत सादर करावी. अन्यथा कुणाची काहीही हरकत नाही असे समजुन वारस प्रमाणपत्र देणेबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी आज दिनांक १३/०६/२०२५ रोजी दिली.

शिक्का

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क.स्तर कोर्ट
संग्रामपूर जि.बुलडाणा


RNINo-MAHMAR 2010/35857 महासागर खामगांव[बुलढाणा]

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय मो.बा.९०२८४५८८८७ भगवान महावीर चौक, खामगाव येथे प्रकाशित केले. मुख्यसंपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय- नागपूर मो.बा.७४४७७३८८५१, ९९२२९७००२३ बुलडाणा जिल्हा आवृत्ती प्रमुख, स्थानिक संपादक यशवंत विनायक पिंगळे मो.बा.९५६१३६१४०४, (शहर कार्यालय-रेल्वेस्टेशन चौक, खामगाव) ई-मेल-yashwantpingle525@gmail.com

# अरण्यऋषी!



**पद्मश्री सन्मानित, पर्यावरण आणि वन्यजीव लेखक 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ लेखक आणि माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचे आज १८ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरमधील त्यांच्या राहत्या घरी सायंकाळी सात वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण आणि साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.**

मराठी वन्यजीव अभ्यासक आणि लेखक म्हणून मारुती चितमपल्ली अख्ख्या महाराष्ट्राला परिचीत आहेत. वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी, नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही ६५ वर्षे जंगलात काढणारे चितमपल्ली यांनी जंगलातील प्राणीजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत केले. त्यांचे वाचनही प्रचंड होते आणि त्यांना पुस्तकांचीही आवड होती. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, लेखक व्यंकटेश माडगूळकर तसेच प्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेरकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता.

चितमपल्ली यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९३२ चा सोलापुरातला. त्यांचे वास्तव्य गुजराथीमिश्रित मराठी बोलणाऱ्यांच्या वाड्यात होते. त्यांचे आजोबा सोलापुरातल्या बुधवार पेठेत राहत. तेथे तेलुगू बोलणाऱ्यांची वस्ती होती. मुस्लिमबहुल वस्तीही जवळच होती. त्यामुळे आई वडील आणि मुले मराठी, गुजराती, तेलुगू आणि उर्दूमिश्रित हिंदी बोलू लागले.

पाचव्या इयत्तेतील स्कॉलरशिपमुळे अकरावीपर्यंत महिना दहा रुपये मिळत असल्याने मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत झाले. भर तापात परीक्षा देऊनसुद्धा मारुती चितमपल्ली वर्गात पहिल्या नंबराने पास झाले. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर चितमपल्लींनी त्यांची वही मराठीच्या प्राध्यापकांना दाखवली, आणि तिच्यातली एक कथा महाविद्यालयाच्या नियतकालिकात प्रकाशित झाली.

त्यांच्या वडिलांना वाचण्याची आवड तर आईला अरण्यवाटांची. आई, वडील, आत्या, मामा यांच्याबरोबर रानवाटेने चालताचालता मारुती चितमपल्लींना जंगलांबद्दल आकर्षण वाटू लागले. क्षणोक्षणी पडे, उठे, परि बळे उडे बापडी ह्या कवितेतील कारुण्य शाळेत असताना जाणवले, आणि जंगलांतील पक्ष्यांविषयी प्रेम वाटू लागले.

आयुष्यभर हरणाची शिकार करणाऱ्या भीमाचा मृत्यू हरणासारखा तडफडत झाला, ही आईने सांगितलेली गोष्ट आयुष्यभर विसरता येण्यासारखी नव्हती. आईला पशुपक्ष्यांची खूप माहिती होती. चंडोल ऊर्फ माळचिमणी, कोकिळा ऊर्फ कोयाळ, सातबहिणी ऊर्फ बोलांड्या, लावा ऊर्फ भुरगुंज्या अशी कितीतरी नावे चितमपल्लींना आईकडून ऐकायला मिळाली.

हरणाच्या नराला काळवीट आणि लांडग्याच्या मादीला लासी असा नर-मादीतला फरक तिनेच शिकविला. माळढोक हे नाव पहिल्यांदा आईनेच ऐकवले. तिने दिलेले रंगांच्या छटांचे ज्ञान पाखरांच्या आणि फुलपाखरांचे वर्णन करताना मारुती चितमपल्लींच्या उपयोगी पडले.

लिंबामामा हा मारुती चितमपल्लींचा अरण्यविद्येतला दुसरा गुरू. प्राणी, पक्षी, वनस्पती तो न बोलता नजरेने दाखवी. वीण झाल्यानंतर सोडून दिलेली सुगरण पक्षाची घरटी त्यानेच दाखविली. त्याच्याबरोबर रानातून चालताना रुई, धोतरा, निवडुंगाची माजलेली झुडपे आणि बोरी, बाभळी, निंबाची काटेरी झुडपे चुकवत चालावे लागे. त्या झाडाखालून चितमपल्लींनी होल्यांची घरटीही शोधली. फुलपाखरांच्या मागे जात गवतामधील कीटकांचे संगीत ऐकायला ते तिथेच शिकले.

अरण्यवाटेवर आणखी एकाने, (हणमंतामामाने) चितमपल्लींना जंगलाचे न्यारे जग शिकवले, पाखरांची नावे त्यानेच सांगितली. तळ्याकाठी पाखरांची पिसे सापडायची. पारी, पोपटी व उदी रंगाची पिसे पाहून हणमंतामामा पाखरांची नावे सांगायचा. मामा खांद्यावर कुदळ घेऊन उंच वारूळ शोधत चालायचा. या वारुळांना ते टेकराज म्हणत, पण हे वारूळ म्हणजेच सापांचे घर कधी दिसले नाही. हणमंतामामाजवळ सापांविषयी खूप ज्ञान होते. विषारी, बिनविषारी सापांपासून तर सापांच्या जाती ओळखण्यापर्यंत आणि सापांची अंडी असे सारे काही चितमपल्लींना हणमंतामामाकडूनच शिकायला मिळाले.

हणमंतामामांनी चितमपल्लींना वन्यप्राण्यांच्या असंख्य लोककथा सागितल्या, आणि तेच ज्ञान पुढे वनखात्याच्या नोकरीत कामी पडले. मामाची अंधश्रद्धाच चितमपल्लींना पशुपक्ष्यांविषयीच्या संशोधनासाठी कारणीभूत ठरली. काय खरे आणि काय खोटे हे ओळखता येऊ लागले.

मारुती चितमपल्लींचे रानाविषयीचे प्रेम आई, माळकरीण आत्या, लिंबामामा आणि हणमंतमामा यांनी जोपासले. त्यांच्यामुळे त्यांना वन्यजीवशास्त्र उलगडले.

पारंपरिक कॉलेज शिक्षणात अपयशी ठरल्यानंतर मारुती चितमपल्ली यांनी वानिकी महाविद्यालयाची वाट धरली. पुण्यातील विभागीय वनाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला. सोलापूरचे राहणारे वनक्षेत्रपाल एम.डी. गाडगीळ यांची पुण्यातील वनसंशोधन केंद्रात भेट घेतली. त्यांनी वनक्षेत्रपालाच्या निवडीसाठी होणारी लेखी परीक्षा, त्याची पूर्वतयारी याविषयी वितमपल्लींना मार्गदर्शन केले.

विद्यापीठ परीक्षेचा निकाल वाईट लागणार होता. तरीही वानिकी महाविद्यालयातील प्रवेशासाठी सर्व परीक्षा गंभीरपणे देण्याचा निर्धार त्यांनी केला. मुलाखतीला कशी उत्तरे द्यायची हे गाडगीळ यांनी सांगितले होते. सोळा मैल चालण्याच्या परीक्षेचा सरावही केला. त्यासाठी आई, मामांसोबत लहानपणी केलेली रानभटकंती उपयोगी ठरली.

एकीकडे विद्यापीठ परीक्षा सुरू असतानाच मुख्य वनसंरक्षकांकडून मुलाखतीकरिता बोलावणे आले. जे. ए. सिंग यांनी त्या वेळी मुलाखत घेतली होती. मुलाखतीत यश मिळाले आणि सोळा मैल चालण्याची परीक्षाही यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यामुळे वानिकी महाविद्यालयातील प्रवेशाची निश्चिती मिळाली. अपेक्षित होते तेच झाले आणि वनखात्याकडून अपेक्षित पत्र आले. मारुती चितमपल्लींची कोईमतूरच्या सदर्न फॉरेस्ट रेंजर्स कॉलेज या वानिकी महाविद्यालयात दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली. या वानिकी महाविद्यालयात प्रवेश झाला आणि मारुती चितमपल्ली यांचे आयुष्य एका वेगळ्या वाटेने पुढे जाऊ लागले.

शिस्त काय असते हे त्यांना या महाविद्यालयाने शिकवले. पहाटे उठणे, ठरलेल्या वेळेनुसार सर्व काही करणे सुरू झाले. वानिकी महाविद्यालयात असताना पहिल्यांदा त्यांनी वनातला अभ्यास दौरा केला. जंगलात राहायचे म्हणजे तंबूत, महिनाभर लागणारे सारे सामान सोबत, असे सारे काही कुतूहलमिश्रित होते.

प्रवेश घेताना १६ मैलांची अट जशी कायम होती, तशी मॅरेथॉन रेसमधून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना १६ मैलांचे अंतर धावत धावत चार तासांत पूर्ण करावे लागे. वनाधिकारी म्हणून तंदुरुस्त आहात की नाही याची ती चाचणी होती. मात्र, पहिल्याच वर्षी मॅरेथान रेसमध्ये धावताना मेंदूतील रक्तस्रावामुळे एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. भविष्यात वनाधिकाऱ्याला कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागू शकते, याचे दाहक वास्तव मारुती चितमपल्लींनी विद्यार्थिदशेतच अनुभवले.

**वनखात्याची नोकरी**

मारुती चितमपल्लींना वनखात्यातील नोकरीत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अलींचा सहवास खूप काही शिकवून गेला. वनखात्यातील नोकरीच्या निमित्ताने चितमपल्लींनी अनेक ठिकाणचे जंगल पिंजून काढले.

पश्चिम महाराष्ट्रात १५ वर्षे नोकरी केल्यानंतर ते विदर्भात नवेगाव बांधला आले. त्यानंतर नागझिरा, नागपूर, मेळघाट येथली जंगले अनुभवली. मात्र त्यांना नवेगाव बांधचे जंगल अधिक आवडले. शिकारीसाठी येणारे माधवराव पाटील त्यांनी तेथेच भेटले. शिकारीच्या निमित्ताने आपल्या सोबत्यांकडून माधवराव वनविद्या शिकले आणि ही वनविद्या त्यांच्याकडून चितमपल्लींना शिकता आली. मात्र, ही वनविद्या साध्य करायला त्यांना अनेक वर्षे लागली.

**संस्कृतचा अभ्यास**

मारुती चितमपल्ली यांनी परंपरागत पद्धतीने संस्कृत साहित्याचे अध्ययन केले आणि त्यानंतर जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यास केला.

रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने प्राचीन भारतीय साहित्यातील पर्यावरण असा एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. चितमपल्ली यांनी ८४ व्या वर्षी त्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि तो अभ्यासक्रम पूर्णही केला.

---

(मारुती चितमपल्ली यांच्यावरील सदर लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज!




बॉम्बे प्रोव्हिन्स, मुंबई प्रांत, मुंबई इलाखा, मुंबई द्विभाषिक राज्य असा प्रवास करीत करीत मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र लढा जोरात उभारण्यात आला. त्यानंतर झालेल्या गोळीबारात एकशे सात बहाद्दरांनी हौतात्म्य पत्करले आणि १ मे १९६० रोजी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला.

मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली परंतु बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर सह ८६५ मराठी भाषिक गावे कर्नाटकातच राहिली. मुंबई महाराष्ट्रात आली, राजधानी झाली. परंतु मुंबईत महाराष्ट्र नाही, मुंबईत मराठीला दुय्यम स्थान मिळाले. म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक हे जागतिक पातळीवरचे पहिले मराठी व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केले.

या मधून अमराठी अधिकाऱ्यांची यादी 'वाचा आणि थंड बसा' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करायला सुरुवात केली. यामुळे मराठी माणसात जागृती निर्माण होऊ लागली.

तीर्थस्वरुप दादा म्हणजे केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांना विचारले की बाळ, पुढे काय करायचं ठरवलंय ? बाळासाहेब म्हणाले, दादा, मराठी तरुणांची संघटना काढायचा विचार आहे. दादा म्हणाले, काढ, संघटना काढ आणि त्या संघटनेला नांव दे 'शिवसेना'. ठरलं.

शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना स्थापन केली. ही लढाऊ बाण्याची संघटना आज हीरक महोत्सवाच्या उंबरठ्यावर उभी आहे. अनेक उन्हाळे, पावसाळे या संघटनेने पाहिले असून काटेरी मार्गावरुन यशस्वीपणे वाटचाल सुरु ठेवली आहे. अनेक आले आणि गेले, पण बाळासाहेब ठाकरे यांच्या कडवट शिवसैनिकांच्या जोरावर ही संघटना भरभक्कम पणे भविष्याचा वेध घेण्यासाठी झेपावली आहे.

१९ जून १९६६ पासून शिवसेनेने अनेकांना सोबत घेऊन वाटचाल करतांना परिणामांचा मुलाहिजा बाळगला नाही. यशवंतराव चव्हाण यांनी सनदी अधिकारी स. गो. बर्वे यांना १९६७ साली कॉंग्रेस पक्षात आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उभे केले. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी कृष्ण मेनन यांच्या विरोधात उभ्या असलेल्या स. गो. बर्वे यांना पाठिंबा दिला.

हे बर्वे कॉंग्रेसचे होते. त्यावेळी 'हटाव लुंगी, बजाव पुंगी' ही घोषणा गाजली होती. दुर्दैवाने स. गो. बर्वे यांचे निधन झाले आणि मग ताराबाई सप्रे या बर्वे भगिनी कॉंग्रेस तर्फे पोटनिवडणुकीत उभ्या होत्या. बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांनाही समर्थन दिले होते.

१९६८ साली मुंबई महापालिका निवडणुकीत मधु दंडवते यांच्या प्रजा समाजवादी पक्षाबरोबर बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. मुस्लिम लीगच्या जी. एम. बनातवाला यांच्या बरोबरही बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. वरळीला आदित्य ठाकरे यांना आव्हान देणारे मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरलीभाई देवरा यांना मुंबईच्या महापौरपदी बाळासाहेब ठाकरे यांनी बसविले.

या मुरलीभाईंनी तब्बल २२ वर्षे मुंबई विभागीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई देविसिंह शेखावत पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी भरभक्कम पणे पाठिंबा दिला होता. या बद्दल शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आभार मानण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री रावसाहेब रामराव (आर आर) पाटील हे दोघे मातोश्रीवर आले होते.

कॉंग्रेसचे चाणक्य समजण्यात येणारे प्रणव कुमार मुखर्जी यांना पाठिंबा देऊन बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना राष्ट्रपती पदी निवडून येण्यासाठी बहुमोल योगदान दिले. शरद पवार, जॉर्ज फर्नांडिस आणि बाळासाहेब ठाकरे यांचे शिवतीर्थावर दसरा मेळाव्यात झालेले मार्गदर्शन अजूनही लोक विसरलेले नाहीत.

१३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिक चे प्रकाशन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थावर पहिल्या दसरा मेळाव्यात बॅरिस्टर रामराव आदिक व्यासपीठावर उपस्थित होते. १९८७ साली विलेपार्ले येथील पोटनिवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम हिंदुत्वाचा मुद्दा घेत डॉ. रमेश प्रभू यांना उभे केले.

त्या विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जनता दलाच्या प्राणलाल व्होरा यांना पाठिंबा दिला होता तर शिवसेनेने हिंदुत्वाचा मुद्दा घेतला असल्याने बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांना समर्थन दिले होते. या हिंदुत्वासाठी बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार सहा वर्षे हिरावून घेतला होता तर रमेश प्रभू यांची आमदारकी रद्दबातल ठरवली होती.

जेंव्हा शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर विलेपार्ले पोटनिवडणुकीत विजयी झाली तेंव्हा भारतीय जनता पक्षाचे चाणक्य प्रमोद व्यंकटेश महाजन यांनी शिवसेनेबरोबर युती करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांना साकडे घातले. १९८९ लोकसभा आणि १९९० विधानसभा निवडणुकीत शिवसेना भारतीय जनता पक्ष युती म्हणून दोन्ही पक्ष एकत्र लढले.

१९९० च्या विधानसभा निवडणुकीत मुंबई मधून निवडून आलेल्या शिवसेना भाजप युतीच्या आमदारांविरोधात कॉंग्रेस पक्षाच्या पराभूत उमेदवारांनी मनुभाई वशी आणि मुकेशभाई वशी यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केल्या.

या निवडणुकीत गिरगांव चौपाटीवर झालेल्या विराट प्रचार सभेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी, महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरातमध्ये राहतो तो गुजराथी, बंगालमध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदू, आमचे हिंदुत्व हे शेंडी जानव्याचे नाही तर आमचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे, अशी हिंदुत्वाची व्याख्या ठणकावून सांगितली होती.

गिरगांव चौपाटीवर झालेल्या सभेचे वृत्तांकन दैनिक सामना साठी मी केले होते म्हणून मला वशी यांनी मुंबई उच्च न्यायालयात साक्षीदार म्हणून बोलावले होते. साक्षीदार म्हणून अंबरनाथ येथून मुंबई उच्च न्यायालयात पाच वर्षे चकरा माराव्या लागल्या. बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वाची व्याख्या मनोहर जोशी यांच्या खटल्यात मनोहर जोशी यांचे वकील जय चिनॉय यांनी माझ्या तोंडून शिताफीने रेकॉर्डवर आणली, एवढेच नव्हे तर ही व्याख्या प्रसिद्ध झालेल्या दैनिक सामनाच्या विविध अंकांचे न्या. सॅम वरियावा यांच्या न्यायालयात सादरीकरण केले.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

याच आधारावर सर्वोच्च न्यायालयात ११ डिसेंबर १९९५ रोजी न्या. जे. एस. वर्मा यांनी मनोहर जोशी यांना हिंदुत्वाच्या खटल्यातून निर्दोष मुक्त केले. ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत बाबरी मशीद धराशायी झाल्यावर पत्रकारांनी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुंदरसिंह भंडारी यांना, बाबरी किसने गिरायी?, असे विचारताच त्यांनी काखा वर करीत, नहीं वे बीजेपी के नहीं थे, आरेसेस के नहीं थे, बजरंग दल के नहीं थे, व्हिएचपी के नहीं थे, असे उत्तर दिले. पुन्हा पत्रकारांनी त्यांना विचारता ते म्हणाले, शायद वे शिवसेना के होंगे.

याच वेळी वांद्रे येथून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एकच डरकाळी फोडली की, जर माझ्या शिवसैनिकांनी बाबरी उद्ध्वस्त केली असेल तर मला त्यांचा अभिमान आहे.

यावर शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांनी बाबरी मशीद धराशायी होतांनाची छायाचित्रे असलेली दिनदर्शिका प्रकाशित केली आणि गर्व से कहो हम हिंदू हैं असे ठळकपणे छापले. त्यावर बंदी घालण्यात आली.

यानंतर मुंबई महाराष्ट्रात दंगल पेटली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेने तमाम हिंदू आणि मराठी बांधवांना वाचवण्यासाठी ढाल म्हणून संरक्षण दिले. या शिवसेनारुपी रक्षा कवचामुळे प्रभावित होऊन गुजराती बांधवांनी गिरगांव चौपाटी जवळ सभागृहात बाळासाहेब ठाकरे यांना सन्मानित केले आणि हिंदुहृदयसम्राट असे संबोधून गौरव केला. तेंव्हापासून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असे रुढ झाले.

५ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ १५ आमदारांना घेऊन बाहेर पडले. त्यानंतर गणेश नाईक, नारायण राणे, राज ठाकरे बाहेर पडले. परंतु उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना एकट्या हाताने निवडणूक लढवून आपले अस्तित्व दाखवून देती जाहली.

१७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या महानिर्वाणानंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने एकहाती ६३ जागा जिंकल्या.

शरद पवारांच्या अदृश्य हाताने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे अल्पमतातील सरकार वाचविले. पण २२ वर्षे जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी २२ दिवसात सहन करावी लागली, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार पाच वर्षे टिकविण्यासाठी धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीवर पाठवून उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यासाठी साकडे घातले.

उद्धव ठाकरेंनी मोठ्या मनाने देवेंद्र फडणवीस याना पाठिंबा दिला. ५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांच्या समर्थनामुळे सायंकाळी मंत्री झाले. २०१९ पर्यंत उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यावर देवेंद्रांचे सरकार टिकले.

१८ फेब्रुवारी २०१९ रोजी अमित शाह मुंबईत आले आणि सॉफिटेल या पंचतारांकित हॉटेलमध्ये उद्धव ठाकरे यांच्या समवेत बंद दाराआड चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दरवाजाबाहेर बसले होते. ते चर्चेत सहभागी झाले नव्हते.

सॉफिटेल, मातोश्री वरील चचेअंती वरळीच्या ब्ल्यू सी हॉटेल मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह आणि उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याची जाहिरात केली.

लोकसभा निवडणूक पार पडली. विधानसभा निवडणुकीत युती म्हणून लढल्यानंतर पन्नास पन्नास टक्के सत्तेच्या जबाबदारी देण्या घेण्याचा करार भारतीय जनता पक्षाने मानला नाही. अखेर शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या तीन पक्षांनी महाविकास आघाडी बनविली.

ही महाविकास आघाडी होऊ शकते असे सर्वात आधी भाकित करणारे आज एकनाथ शिंदे यांचे प्रवक्ते बनलेत. दरम्यान २३ नोव्हेंबर २०१९ रोजी सक्काळीच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री असा शपथविधी उरकून घेतला. परंतु ८० तासातच अजितदादांनी घूमजाव केले. सर्वात कमी ८० तासांच्या मुख्यमंत्री पदाचा विक्रम देवेंद्र फडणवीस यांच्या नांवे नोंदला गेला.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री म्हणून शपथ घेतली. याच काळात कोरोनाची खतरनाक महामारी फैलावली. स्वतः उद्धव ठाकरे गंभीर आजारातून बाहेर पडले. या काळात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल एक नव्हे दोन नव्हे तर चार चार वेळा राष्ट्रीय पातळीवर वाखाणणी होत होती.

अजित पवार यांना उद्धव ठाकरे यांनी माझे, शिवसेनेचे जे काही असेल ते एकनाथ शिंदे आपणांस सांगतील, असे सांगितले होते. त्याचा पुरेपूर फायदा एकनाथ शिंदे यांनी उचलला. अडीच वर्षे सत्ता उपभोगूनही एकनाथ शिंदे आणि त्यांच्या साथीदारांनी अजित पवार हे निधी उपलब्ध करून देत नाहीत, अशा तक्रारींचा लकडा लावला.

जून २०२२ मध्ये शिवसेना फोडून बाहेर पडले. सुरत, गुवाहाटी, गोवा करीत अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांचे सरकार उलथवीत भारतीय जनता पार्टी बरोबर सरकार बनविले. मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या पदरी उपमुख्यमंत्री पद आले. त्यांना सरकार बाहेर राहून सरकारवर नियंत्रण ठेवायचे होते. परंतु पक्षश्रेष्ठींनी त्यांचा मनसुबा उधळवून लावला.

----------

(या लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात प्रकाशित केला जाईल.)

■ ■ ■

# बाळ आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान!

**(१४ ते २० जून :**
**जागतिक रक्तदाता दिवस सप्ताह)**

रक्तदान केल्याने आपल्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात, त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानास प्रवृत्त करणे, असे जागतिक रक्तदाता दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरवर्षी १४ जून रोजी संपूर्ण जगातील रक्तदात्यांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. रक्त संक्रमणासाठी सुरक्षित रक्त व रक्त उत्पादनांची आवश्यकता, राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेत स्वयंसेवी आणि विनाअनुदानित रक्तदात्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी जागतिक जागरूकता वाढविणे, हाही यामागील हेतू आहे. हा दिवस सरकार आणि राष्ट्रीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक संसाधने उपलब्ध करुन देण्यासाठी, स्वेच्छा, मोबदला न मिळालेल्या रक्तदात्यांकडून रक्त संग्रह वाढविण्यासाठी तसेच यंत्रणा व पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी कृती करण्याची संधी प्रदान करतो.

---

शास्त्राप्रमाणे जीवनदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामान्य व्यक्तीही रक्तदान करून दुसऱ्याचा जीव वाचवू शकते. रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सन २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा करते. आजदेखील समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे रक्तदात्याला रक्तदानास प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना हा दिवस साजरा करत असते.

ए-बी-ओ या रक्तगटांचा शोध लावणारे आणि रक्तदान संकल्पनेला अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे शरीरविज्ञानात नोबेल पारितोषिक प्राप्त डॉ. कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जागतिकस्तरावर साजरा केला जातो. डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दि.१४ जून १८६८ रोजी ऑस्ट्रियात झाला. त्यांचीच आज जयंती जागतिक रक्तदाता दिन म्हणून पाळण्यात येत आहे. हा दिवस सर्वप्रथम सुरू करण्याकरीता दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न करण्यात आले होते.

स्वेच्छेने व मोबदला न घेता सुरक्षित रक्तदान करण्याच्या गरजेबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला. मे २००५मध्ये डब्ल्यूएचओने एका जागतिक आरोग्य असेंब्लीच्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १९२ सदस्य देशांसह अधिकृतपणे समितीची स्थापना केली. जेणेकरुन जगातील सर्व देशांना रक्तदात्यांच्या बहुमोल कृतीबद्दल आभार मानण्यास आणि लोकांचे जीवन वाचवण्यास प्रवृत्त केले जाईल. हा दिवस साजरा करण्याची उद्दिष्टे लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे आहे.

अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही. त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते. मानवाच्या शरीरामध्ये साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली रक्त काढले जाते.

प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांत रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही. ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये फक्त ४-५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते.

अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. आपल्या भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळण्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात.

रक्तदान हे एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने अंगातून रक्त काढून देण्याची क्रिया आहे. असे रक्त रुग्णाच्या शरीरात चढवण्यापूर्वी बायोफार्मास्युटिकल प्रक्रियेद्वारे त्याचे विभाजन केले जाते व संपूर्ण रक्त किंवा रक्ताचा आवश्यक तोच घटक त्याच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. रक्त संकलन प्रक्रियेत ब्लड बँक- रक्त बँकांचा सहभाग असतो.

बहुतेक रक्तदाते- स्वयंसेवक स्वखुशीने अणि विनामोबदला रक्तदान करतात. काही देशांमध्ये रक्ताचा पुरवठा मर्यादित आहे. कारण देणगीदार फक्त नातेवाईकांसाठी किंवा मित्रांसाठीच रक्त दान करतात. अनेक रक्तदाते रक्तदान एक देणगी म्हणून करतात. परंतु ज्या देशांमध्ये रक्त विकण्याची परवानगी आहे, तिथे रक्तदात्यांना पैसे मिळतात. रक्तदानासाठी काही ठिकाणी कामकाजावरून मोकळा वेळ दिला जातो.

वयाच्या १८ वर्षानंतर ते ६५ वर्षापर्यंत, वजन ४५ किग्रॅंच्या वर असल्यास, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, अशा निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते. तर रक्तदात्याने आधीच्या ३ दिवसांत कोणतेही प्रतिजैविक औषध घेतलेले असल्यास, रक्तदात्याला मागील ३ महिन्यात मलेरिया झाला असल्यास, रक्तदात्याला मागील १ वर्षात विषमज्वर, कावीळ किंवा श्वानदंश होऊन त्याने रेबीजची लस घेतली असल्यास, त्याची ६ महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास, गर्भवती महिला, महिलेला १ वषार्खालील मूल असल्यास किंवा तिचा ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास अशांना रक्तदान करता येत नाही. ब्लड प्रेशर लो किवा हाय असणाऱ्यांनी रक्तदान करताना रक्तदाबाची चाचणी करून पहावी, उपाशी पोटी किवा खाऊन झाल्यावर अर्ध्या तासापर्यंत रक्तदान करू नये. तसेच रक्तदानास इच्छुक असणारास इतरही आजारांची चाचणी करून घ्यावी लागते.

सद्या तर आपल्या देशात वर्षभरच रक्तदान शिबीरे आयोजित करून भरपूर रक्तसंकलन केले जात आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सेवाभावी संस्था रक्तदान शिबीरांच्या माध्यमातून संकलीत रक्तसाठा रक्तपेढ्यांकडे सुपूर्द करीत असतात. गरजूंना रक्त वेळेत मिळत नाही. प्रसंगी आर्थिक टंचाईच्या कारणाने गरीबांना प्राणानिशी मुकावे लागत आहे.

मग एवढा संकलीत रक्तसाठा जातो तरी कुठे? रक्ताचा काळा बाजार होत नाही ना? हा संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. नेहमीच आरोग्य विभागाची बोंब ऐकू येते, की रक्तपेढीत रक्तच उपलब्ध नाही. याकडे आज निक्षून लक्ष घालण्याची गरज असल्याची ओरड गरीब व सर्वसामान्य जनतेतून होणे साहजिकच आहे.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

### फडणवीस, गडकरी एकाच ठिकाणी करणार

# कोट्यवधींच्या प्रकल्पांचे लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :
महापालिका निवडणुकीच्या तयारीला वेग आला असून भाजपच्या नेतृत्वाखालील महायुती शहरात अनेक पूर्ण झालेल्या पायाभूत सुविधा आणि सार्वजनिक उपयुक्तता प्रकल्पांचे उद्घाटन करून धुराळा उडवणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे २२ जून रोजी ९५ कोटींहून अधिक किमतीच्या प्रकल्पांचे लोकार्पण करतील.

नागपूर महापालिकेतील लोकप्रनिधीची मुदत मार्च २०२२ मध्ये संपली आणि तेव्हापासून, ही संस्था प्रशासकाच्या अधीन आहे. तथापि, राज्य सरकारने अलीकडेच प्रभागांच्या सीमांकन प्रक्रियेची अधिसूचना काढल्याने शहर हळूहळू निवडणुकीकडे वाटचाल करत आहे. ही साधण्यासाठी सत्ताधारी भाजप २००७ पासूनच्या त्यांच्या तीन टर्म्समध्ये केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडत आहे.

उद्घाटनासाठी नियोजित प्रमुख प्रकल्पांमध्ये ५५.२९ कोटींचा पीएमएवाय स्वप्ननिकेतन प्रकल्प समाविष्ट आहे, जो परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आहे. ओंकार नगर गृहनिर्माण. १८.३८ कोटी रुपये खर्चून बांधलेले




पाचपावली अग्निशमन केंद्र आणि २७ आयुष्मान आरोग्य मंदिरे (कल्याण केंद्रे) यांचाही या यादीत समावेश आहे, जे शहरी आरोग्य आणि आपत्कालीन प्रतिसाद पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यावर भर देते.

इतर प्रकल्पांमध्ये ५.४७ कोटी खर्चाचे ट्री ट्रान्सप्लांटर मशीन, ४.१४ कोटी किमतीचे तीन नवीन फायर टेन डेअर, ओम नगर येथे एक सुविधा (४५.६८ लाख), रस्ते दुरुस्तीसाठी हॉट मिक्स प्लांट २.२१ कोटी) आणि ३.२३ कोटी खचार्चे कलामना स्विमिंग पूल यांचा समावेश आहे.

यामध्ये मेहंदीबाग, दही बाजार, सक-करदरा आणि दिघोरी येथील उड्डाणपुलाखालील लँडस्केपिंग; जेपी नगर मेट्रो स्टेशनजवळील ग्राफिटी भित्तीचित्रे; आणि नरेन्द्र नगर चौकात उभ्या असलेल्या महिला आणि एका अंतराळवीराच्या बाईकवरील भित्तीचित्रे यासारख्या सार्वजनिक कला प्रतिष्ठानांचा समावेश आहे.

या प्रकल्पांचे उद्घाटन हे आगामी महापालिका निवडणुकीपूर्वी त्यांच्या विकासाच्या श्रेयला बळकटी देण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

### पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना

# इच्छेनुसार तिसरी भाषा

### हिंदी भाषेच्या सक्तीवर शिक्षण मंत्री भुसे यांचे स्पष्टीकरण

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ :
पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या सरकारच्या वादग्रस्त निर्णयाचे तीव्र राजकीय पडसाद उमटत आहेत. त्यामुळे राज्याच्या शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी या प्रकरणी एक पाऊल मागे घेतले आहे. या प्रकरणी त्यांनी सद्यस्थितीत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार तिसरी भाषा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे ते म्हणालेत.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले की, सद्यस्थितीत पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार तिसरी भाषा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देवनागरी लिपीमुळे व संवाद साधत असताना मोठ्या प्रमाणात हिंदी भाषेचा वापर केला जातो. त्यामुळे विद्यार्थी मागणी करतील त्याप्रमाणे त्यांना तिसरी भाषा शिकवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

कोणत्याही वर्गातील एकूण पटसंख्येपैकी २० विद्यार्थ्यांनी एखाद्या भाषेची मागणी केली, तर त्यांना त्यांच्या पसंतीची भाषा शिकवली जाईल. ती भाषा शिकवणारा शिक्षक त्या शाळेला उपलब्ध करून दिला जाईल. काही ठिकाणी पटसंख्या कमी असेल किंवा विद्यार्थी कमी असतील तर त्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने त्याच्या पसंतीची भाषा शिकवण्याची व्यवस्था केली जाईल अथवा इतर सुविधा निर्माण करून दिल्या जातील, असे भुसे म्हणाले.



**मराठी शाळा टिकवण्यावर भर**

गत काही वर्षांत मुंबईतील १३२ मराठी शाळा बंद पडल्याची बाब पत्रकारांनी यावेळी शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर दादा भुसे यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली. ते म्हणाले, ही वस्तुस्थिती आपल्याला स्वीकारावी लागेल. पण राज्यातील मराठी शाळा कशा टिकतील, कशा वाढतील याकडे आमचे सरकार लक्ष देत आहे. महापालिका शाळा वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे, असे ते म्हणाले.

**तर शाळांवर कारवाई...**

राज्यातील सर्वच माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य करण्यात आले आहे. पण त्यानंतरही अनेक शाळांत मराठी भाषा शिकवली जात नाही. सरकार त्यांच्यावर कारवाई करणार का? या प्रश्नावर दादा भुसे म्हणाले, अशी बाब सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर त्या शाळांवर कठोर कारवाई केली जाईल. यासंबंधी एक-दोनदा समज दिली आहे. त्यानंतरही त्यांनी मराठी भाषा शिकवणे सुरू केले नाही, तर त्या शाळांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला जाईल.

## एकनाथ शिंदेंवर विखारी टीका

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नXXX राजकारणी असल्याची जहरी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी केली आहे. एकनाथ शिंदे यांच्यात स्वतःच्या पक्षातला किंवा स्वतःचा कार्यकर्ता निर्माण करण्याची ताकद नाही. ते नपुंसक राजकारणी आहेत, असे ते म्हणालेत. विनायक राऊत यांच्या या विधानाचे राजकीय वतुर्ळात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.



काल उद्धव ठाकरे यांनी बोलावलेल्या दोन नगरसेवकांनी आज शिंदे गटात जाण्याची घोषणा केली आहे. यामुळे संतापलेल्या विनायक राऊत यांनी गुरूवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना एकनाथ शिंदे यांच्यावर उपरोक्त शब्दांत टीका केली आहे. ते म्हणाले, आमच्या २२ नगरसेवकानी उद्धव ठाकरे याना आपल्याला शिंदे गटाकडून वेगवेगळे आमिष दाखवले जात असल्याचे सांगितले. बाजारात शिंदे यांचे काही दलाल गिऱ्हाईक शोधत फिरत आहेत.

दुसऱ्याकडून माल विकत घ्यायचा आणि स्वतःचा पक्ष चालवयाचा असे त्यांचे काम सुरू आहे. आज शिंदे गटात जाणाऱ्या लोकांनी अगोदरच आपला निर्णय घेतला असेल. ते केवळ उद्धव ठाकरे काय बोलतात? हे पाहण्यासाठी त्यांच्या बैठकीला आले होते. ते शिंदे गटात जाणार हे आम्हाला यापूर्वीच समजले होते. शिंदे गटाच्या दलालांमध्ये मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या एका अधिकाऱ्याचा समावेश आहे. नीमेश रेवडेकर असे त्याचे नाव आहे. हा अधिकारी विविध नगरसेवकांच्या घरी जातो. त्यांच्या घरच्या मंडळींना फोन करतो. साहेब तुमच्या आयुष्याचे भले करणार असल्याचे सांगतो, असे ते म्हणाले.

## शिंदेसेनेचा सेवा रथ पंढरपूरच्या दिशेने रवाना

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :
आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना व धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या वतीने आयोजित ‘वारकरी सेवा रथ २०२५’ काल पंढरपूरकडे भव्य प्रस्थान ठेवण्यात आले. उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या रथाला भगवा झेंडा दाखवण्यात आला. लाखो पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

हा उपक्रम शिवसेनेच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असून, यंदाचे दुसरे वर्ष आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या

**लाखो वारकऱ्यांसाठी मोफत सेवा**

मार्गदर्शनाखाली आणि धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांच्या नेतृत्वाखाली ११२ सदस्यांची चमू सेवा देण्यासाठी सज्ज झाली आहे.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी पुढील सुविधा रथातून दिल्या जाणार आहेत.
पायी चालणाऱ्यांचे पाय सुरक्षित ठेवण्यासाठी कापडी बुटांचे वाटप, औषधे, फोडावर ट्यूब्स व जखमांसाठी उपचार, पावसाळ्यापासून संरक्षणासाठी रेनकोट, छत्र्या, टाळ, ग्रंथांसाठी हँडबॅग्ज, शुद्ध पिण्याचे पाणी व इतर मूलभूत गरजांची पूर्तता, विश्रांती स्थळी पायाची मालिश देणारी सेवा

या सेवा रथातून केवळ सेवा नाही तर समाजप्रबोधनही केले जाणार आहे. विविध शासकीय योजनांची माहिती, प्रबोधनात्मक कीर्तन, वासुदेव-गोंधळी यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश दिला जाणार आहे. शिवसेनेने आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याचा प्रचार आणि एकनाथ शिंदेंच्या विविध जनहित योजनांचा लाभ थेट वारकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हेतू असल्याचे सांगण्यात आले.

## लाखो वारकरी करणार योग : मुख्यमंत्रीही येणार

### जागतिक योगदिनी पुण्यात वारकरी भक्तियोग उपक्रम

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :
श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या २१ जून रोजी पुणे शहरात राहणार असून या दिवशीच जागतिक योग दिन आहे. या योग दिनाच्या निमित्ताने राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य वारकरी भक्तियोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम होणार आहे. या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधी, योग अभ्यासक असे साधारण १० लाख लोक योग करून, योग विषयाचा प्रसार - प्रचार करतील.

महाराष्ट्र सरकार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे महानगरपालिका, राष्ट्रीय सेवा योजना, श्रीक्षेत्र आळंदी, श्रीक्षेत्र देहू, विद्यार्थी विकास मंच यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

वारीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज आणि तुकाराम महाराज यांच्या पालख्या पुण्यात मुक्कामी असतात. यंदा त्याच वेळी जागतिक योग दिन आला आहे. या निमित्ताने २१ जूनला सकाळी वारकरी भक्तियोग उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम होणार आहे.

## सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने गुरूवारी हिंदीच्या कथित सक्तीवरून पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधला.



हे सरकार नवीन शैक्षणिक धोरणाच्या नावाखाली भाषा त्रिसूत्री धोरण लागू करून हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे बालवयातील विद्यार्थ्यांच्या वयावर काय परिणामी होईल किंवा त्यांना हा अभ्यास झेपेल का? याचा कोणताही विचार सरकारने केला नाही, असा आरोप मनसेने या प्रकरणी केला आहे.

मनसेचे नेते राजू पाटील यांनी आपल्या पक्षाची भूमिका विस्तृतपणे विषद केली आहे. यापूर्वी इयत्ता १ली ते ४थीच्या वयोगटातील मुलांना तिसरी भाषा शिकण्याची सक्ती कधीच नव्हती. एक तर विद्यार्थ्यांना अगोदरच मराठी या मातृभाषेबरोबर इंग्रजी ही भाषा शिकावी लागते.

त्यात जर आणखी एका भाषेची भर पडली तर मुलांच्या बौद्धिक विकासावर प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

बालमनावर मराठी भाषा, मराठी कविता, मराठी साहित्य या बिंबायला हव्यात. तर त्यांना भाषेविषयीची आत्मियता, मराठी भाषेविषयीचा ओलावा त्यांचा मनात राहील. नाही तर एक ना धड भाराभर चिंध्या.. अशी स्थिती होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली.

: सिनेरंग :

## गाडी नंबर १७६० चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

लोकरंजन

मराठी चित्रपटसृष्टीत थ्रिलर, रहस्य आणि विनोदी यांचा मिलाफ असणाऱ्या काही निवडक चित्रपटांमध्ये लवकरच आणखी एका दमदार चित्रपटाची भर पडणार आहे, ती म्हणजे गाडी नंबर १७६० ची.

तन्वी फिल्म्स प्रस्तुत आणि योगीराज संजय गायकवाड दिग्दर्शित या आगामी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, रहस्य आणि विनोदाने भरलेला हा ट्रेलर सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. ट्रेलरमध्ये दिसतेय की, प्रत्येकजण पैशांनी भरलेल्या एका काळ्या बॅगेच्या मागे लागलेला आहे. ही बॅग कुणाची आहे? तिच्यामध्ये काय




दडलं आहे? आणि गाडी नंबर १७६० चं या सगळ्याशी काय संबंध आहे? हे सगळं एक अनोखं रहस्य आहे, जे ४ जुलैला चित्रपटगृहात उलगडणार आहे.

दरम्यान चित्रपटातील वातावरण हलकं-फुलकं असलं तरी, त्यामागे एक खोल आणि विचार करायला लावणारं कथानक आहे. प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच, एक मोठं रहस्य शेवटपर्यंत उलगडत जाणार आहे आणि ही या चित्रपटाची खासियत ठरणार आहे. तन्वी फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे निर्माते कैलाश सोराडी आणि विमला सोराडी आहेत, तर लेखन योगीराज संजय गायकवाड यांनी केले आहे.

चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील प्रथमेश परब, शुभंकर तावडे, प्रियदर्शिनी इंदलकर, सुहास जोशी, प्रसाद खांडेकर, श्रीकांत यादव आणि शशांक शेंडे यांसारख्या दमदार कलाकारांचा सहभाग आहे. ■ ■ ■

## गश्मीर महाजनीचा नवा अध्याय सुरू

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी आता एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गश्मीरने चित्रपट, हिंदी मालिका, नृत्यामुळे प्रेक्षकांच्या मनात स्वतःचे एक स्थान निर्माण केले आहे.

आता गश्मीर लेखक-दिग्दर्शक आणि निर्मात्याच्या भूमिकेत पदार्पण करत आहे. विशेष म्हणजे, त्याच्या वाढदिवसानिमित्ताने त्याने त्याच्या या पहिल्या चित्रपटाच्या मुहूर्ताची सोशल मीडियावर घोषणा केली. जीआरम्स इव्हेंट्स अँड प्रॉडक्शन या निर्मिती संस्थेअंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होत आहे.

या चित्रपटाचे निर्माते गौरी महाजनी, माधवी महाजनी आणि गश्मीर महाजनी असून लेखन व दिग्दर्शन गश्मीर स्वतः करत आहे. अभिनय क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव असलेला गश्मीर आता कॅमेऱ्यामागे जाऊन एक नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. या चित्रपटाचे छायाचित्रण सुप्रसिद्ध डीओपी सत्यजीत शोभा श्रीराम यांच्या कॅमेऱ्यातून साकारले जात आहे. गश्मीरच्या या नव्या इनिंगबद्दल मराठी सिनेसृष्टीतूनही शुभेच्छांचा वर्षाव होत असून या चित्रपटाचं नाव आणि कलाकार जाणून घेण्याबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

आपल्या या नवीन प्रवासाविषयी गश्मीर महाजनी म्हणतो, दिग्दर्शन हे माझं एक दीर्घकाळापासूनचं स्वप्न आहे. अभिनय करताना अनेक गोष्टी शिकल्या, अनुभवल्या आणि आत खोलवर काही सांगायचं राहून गेलं होतं. आता त्या भावना, ती विचारांची प्रक्रिया मी कॅमेऱ्याच्या मागून मांडणार आहे.

चित्रपट ही एक सामूहिक कला आहे, मात्र काही कथा अशा असतात, ज्या फक्त आपल्या दृष्टिकोनातूनच सांगितल्या जाऊ शकतात. माझा हा चित्रपट म्हणजे माझ्या मनात कित्येक वर्षांपासून रुजत गेलेली कल्पना आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने ही गोष्ट सुरु करत असल्यामुळे हे एक भावनिक आणि प्रेरणादायी क्षण आहेत. ■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



### झी टॉकीजची आषाढी वारी सुरू भक्तीचा गजर घराघरात!

वारी म्हणजे चालणं नव्हे, ती म्हणजे भावना. पंढरपूरच्या रस्त्यांवर लाखोंच्या पावलांचा नाद, मातीचा गंध, आणि विठोबाच्या नावानं मन भरून येणारा प्रत्येक क्षण. पण सगळ्यांना ती चालता येतेच असं नाही. कधी तब्येत, कधी जबाबदाऱ्या, तर कधी वय... पंढरपूर दूर राहतं. म्हणूनच यंदा झी टॉकीजने घेतलेली ही सुंदर शपथ ज्यांना चालता येत नाही, त्यांच्यासाठी वारी घरी यावी!..

म्हणूनच विठ्ठल झाला तयार वारीसाठी!
१८ जूनपासून ते ६ जुलै एकादशीपर्यंत, आषाढी वारी २०२५ हा भक्तिपूर्ण सोहळा झी टॉकीजवर साजरा होणार आहे आपल्या घरच्या टीव्हीवर!
यंदाची वारी का खास आहे? संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५०व्या जयंतीवर्षात होणारी ही वारी आहे. पहिल्यांदाच थेट प्रक्षेपित होणारी चंद्रभागेची आरती असणार आहे. १२ फूट उंच विठ्ठल-रुक्मिणी मूर्ती पंढरपूरची अनुभूती, घराघरात! दिसणार आहे. भाविक आणि कीर्तनकारांची सजीव सादरीकरणं या वारीत असणार आहे.
प्रत्येक पहाटे थेट काकड आरती असेल तर दिवसभर गजर कीर्तनाचा, मन मंदिरा, चाल गं सखे पंढरीला सारखे भावस्पर्शी कार्यक्रम प्रसारित होतील. तेंव्हा तयार व्हा १८ जून ते ६ जुलै ... दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत फक्त झी टॉकीजवर. ■ ■

### एनआरएचएम कर्मचाऱ्यांचे

## तीन महिन्यांपासून वेतन रखडले

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १९ :
राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या हिश्शापोटीचा निधी न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना पगार देता येत नसल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

तीन महिन्यांपासून कर्मचाऱ्यांना पगार मिळत नसल्याने त्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अमरावती विभागात एनएचएमअंतर्गत विविध पदांवर हजारो कर्मचारी काम करत आहेत. त्यांना राज्य सरकारमार्फत मानधन दिले जाते. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून हे मानधन मिळालेले नाही. आरोग्य विभागात दोन सचिव, आरोग्य आयुक्त तसेच अनेक कर्मचारी असूनही केंद्राकडून जो निधी मिळणे अपेक्षित आहे तो वेळेवर का मिळत नाही, असा सवाल करण्यात येत आहे.

जिल्हा परिषद असो वा महानगरपालिकेचा आरोग्य विभाग यामध्ये कायमस्वरुपी सेवा देणारे डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ व इतर कर्मचारी ज्या सेवा देतात त्याच सेवा राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचारीही देतात; मात्र, वेतनात दुप्पट-तिपटीने तफावत असल्याचे समोर आले आहे.

**निधी मिळालेला नाही**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे. शासनाकडून निधी न मिळाल्याने त्यांना अद्याप वेतन देता आलेले नाही, असेआरोग्य उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांनी सांगितले.

केंद्राच्या ६० टक्के, तर त्या त्या राज्य सरकारच्या ४० टक्के निधीतून सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनासह विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात. आरोग्य विभागात कायमस्वरुपी सेवा देणारे डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ व इतर कर्मचारी ज्या सेवा देतात त्याच सेवा ‘एनएचएम’चे कर्मचारीही देतात; मात्र दोघांच्या वेतनात दुपटी-तिपटीने तफावत आहे.

कायमसेवेतील डॉक्टरला एक-सव्वा लाख रुपयांपर्यंतचे वेतन आहे, तर एनएचएमच्या डॉक्टरला ३५ ते ४० हजार रुपयांचे वेतन आहे. कायम सेवेतील परिचारिकेला ७० ते ८० हजार रुपये वेतन मिळते तर एनएचएमच्या परिचारिकेता २२ ते २५ हजार रुपये मिळतात अशीच तफावत इतर सर्व पदांमध्ये आहे.

### विहिरीला लटकवत ठेवला मृतदेह

## हत्या करून आत्महत्येचा बनाव

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १९ :
जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात शेगाव मार्गावर एका विहिरीमध्ये तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आला.

आरोपीने हत्या करून मृतदेह विहिरीत लटकवत ठेऊन आत्महत्या केल्याचा बनाव रचला होता. पोलीस तपासामध्ये ही हत्या असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

बुलढाणा जिल्ह्याच्या संग्रामपूर तालुक्यातील निरोळा येथील अंकुश श्रीराम सुरडकर (३२) या तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर मृतदेह बाळापूर-शेगाव मार्गावरील सातरगाव शिवारातील विहिरीत दोरीच्या साहाय्याने लटकवून आत्महत्येचा बनाव केला होता.

या घटनेची माहिती मिळताच बाळापूर पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेतली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला. मृतदेह अनोळखी असल्यामुळे ग्रामीण रुग्णालयात ठेवून बाळापूर पोलिसांनी ओळख पटवण्याचा प्रयत्न सुरू केला. अखेर मृतकाची अंकुश सुरडकर रा.निरोळा, ता. संग्रामपूर अशी ओळख पटली.

मृतदेहाच्या उत्तरीय तपासणी अहवालामध्ये गळा दाबून व डोक्यावर जबर मारहाण करून हत्या झाल्याचे स्पष्ट झाले. गळा दाबणे आणि डोक्यावरील मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक विनोद हिवराळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बाळापूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर भेट देऊन पाहणी केली. आरोपीचा कसून शोध घेतला जात आहे.

**जिल्ह्यात हत्येचे सत्र**

अकोला जिल्ह्यात हत्येचे सत्र सुरूच आहे. वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये हत्येचे गुन्हे दाखल झाले आहेत. अकोला शहरात मद्याच्या वादामधून काकानेच पुतण्याला मारून टाकले होते. दगडाने ठेचून ३१ मे रोजी ही हत्या करण्यात आली होती. त्यानंतर २ जून रोजी सेवानिवृत्त अभियंता संजय कौसल यांची गुंड प्रवृत्तीच्या महेंद्र पवार याने निर्घृण हत्या केली.

अकोट तालुक्यात २२ वर्षीय तरुणाची हत्या झाली. पातूर तालुक्यातील विवरा परिसरात १० जूनला एका व्यक्तीचा संशयास्पद मृत्यू झाला. मात्र, ती हत्या असल्याचे स्पष्ट झाले.

# रेशनचे धान्य विकल्यास रेशन कार्डच रद्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
यंदाच्या महिन्यात रेशन दुकानात तीन महिन्याचे धान्य एकत्र मिळत आहे. दरिद्ररेशेखालील नागरिकांना हे धान्य निःशुल्क मिळते. त्यामुळे काही व्यक्ती हे धान्य वस्ती-वस्तीतून खरेदी करत खुल्या बाजारात विकत आहे. पुरवठा विभागाकडून काही भागात छापा टाकून धान्य जप्त केल्यावर हा प्रकार पुढे आला. आता पुरवठा विभागाने हे धान्य विक्रणाऱ्याचे रेशन कार्ड रद्द करण्याचे विचाराधीन आहे.

नागपूरसह राज्यातील काही भागात रेशनचे धान्य लोकांकडून विकत घेऊन ते खुल्या बाजारात विकणारे धान्य तस्कर सक्रीय आहे. पुरवठा विभागानेही त्यांच्यावर लक्ष केंद्रीय केले आहे. आतापर्यंत नागपुरात दोन ठिकाणी धापा टाकून बरेच धान्य जप्त केले गेले.

सूत्रांच्या माहितीनुसार यंदा पावसाळ्यात रेशनचे धान्य घेताना गरीब व गरजूंना अधिक त्रास होऊ नये म्हणून राज्य सरकारने तीन



महिन्यांचे रेशन एकाचवेळी देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार रेशन वाटपाला सुरुवात झाली आहे.

तीन महिन्यांचे रेशन एकाचवेळी मिळत असल्याने साठेबाजी करणारे धान्य तस्करही सक्रीय झाले आहे. काहींनी तर रेशन दुकानांवरच ठाण मांडले आहे. अधिकचे धान्य असल्याने गरीबही थोड्या पैशांसाठी ते धान्य देण्यास तयार होतात. याचाच फायदा घेऊन ते ग्राहकांकडून धान्य विकत घेतात आणि खुल्या बाजारात विकतात. वस्त्या वस्त्यांमध्ये फिरून रेशनचे धान्य विकत घेतले जात आहे.

हा प्रकार उघडकीस येताच पुरवठा विभागानेही कारवाई सुरु केली. बंगाली पंजा आणि ताजनगर परिसरात धाड टाकण्यात आली. तेथून शेकडो पोती धान्य जप्त करण्यात आले. यासोबतच रेशनचे धान्य घेऊन ते जाणीवपूर्वक विकणाऱ्यांवरही विभागाची करडी नजर आहे. हा गैरप्रकार थांबवण्यासाठी पुरवठा विभाग पुढे सरसावला आहे.

**धान्य १२ प्रकारच्या व्हिटॅमिन्सने युक्त**

रेशन दुकानातील तांदूळ हे पौष्टिक आहेत. त्यात आयर्न, फॉलिक ॲसिड, व्हिटॅमिन बी- १२, व्हिटॅमिन- ए, व्हिटॅमिन बी- १, बी- ३ यासह एकूण १२ प्रकारची व्हिटॅमिन्स आहेत. त्यामुळे हे पौष्टिक धान्य स्वतः वापरा ते विकू नका, असे आवाहन शहर पुरवठा विभागाने केले आहे.